# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००६ |
| वर्ष | : | सातवे |
| अंक | : | ९ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |


**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या**
**“ग्रंथालय” प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : १०८**

MAHMAR 19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ
ठाणे



# व्ही. पी. एम्. दिशा

वर्ष सातवे / अंक ९ / ऑगस्ट २००६

## संपादकीय

### जगायची पण सक्ती आहे, मरायची पण सक्ती आहे

सदरचा अंक हाती येईल तोवर ११ जुलै रोजी मुंबईत घडवून आणण्यात आलेले बॉम्बस्फोट हा विषय जुना, स्मृतिआड झालेला असेल. या बॉम्बस्फोटानंतर वर्तमान पत्रे व दृकश्राव्य माध्यमवाले 'सलाम मुंबई' 'शाब्बास मुंबई' अशा आशयाचा मजकूर भरभरून देत होते. तत्पूर्वीच 'मुंबईकर हा उद्धट आहे' असा निष्कर्ष काढणाऱ्या नियतकालिकाचे विधान वादग्रस्त ठरले होते. मुंबईला सलाम एवढ्यासाठीच केला गेला की बॉम्बस्फोट होऊनही मुंबई सावरली! ९३ सालच्या बॉम्बस्फोट मालिकेनंतरही 'मुंबईकर किती महान' या आशयाचा मजकूर भरभरून वहात होता.

वास्तविक प्रत्येक लोकल प्रवासी, पादचारी किंवा बस प्रवासी हा मुंबईत रहातो, कामासाठी बाहेर पडतो ते दहशतवादाच्या दहशतीची टांगती तलवार डोक्यावर घेऊनच. 'आपण कधी बळी पडू ते सांगता येत नाही, पण काय करणार, पोटासाठी बाहेर तर पडायला लागतंय' ही असहायता, मजबुरी प्रत्येक शहरवासियाच्या चेहऱ्यावर स्पष्ट वाचता येते.

बॉम्ब स्फोटासारख्या दहशती कारवायांवर बंदी कशी घालायची, त्याचा शोध कसा घ्यायचा आणि एकूणच जीवन व्यवहाराकडे लक्ष कसे ठेवायचे हे जगभरच आव्हान आहे. गाडीत शिरलेला कोण माणूस कोणत्या इराद्याने चढलाय, तो काय करणार आहे, कसे वागणार आहे याला कोणताही नियम नाही. संचार स्वातंत्र असल्याने सुरक्षा व्यवस्था कडक असायला हवी. पण म्हणजे काय? रेल्वे पोलिस व राज्याचे पोलिस वेगळे. त्यातही या सुरक्षा रक्षकांची नोकर भरती नसल्याने असलेल्या व्यवस्थेवर पडणारा ताण हा नेहमीचा प्रश्न! लोकसंख्या वाढते पण हवी तेथे हवी तितकी माणसे, प्रशिक्षित माणसे पुरविली जात नाहीत, हे दुखणे खोलवर मुरलेले. मग क्लोज सर्किट टी.व्ही., मेटल डिटेक्टर्स असे काही पर्याय शोधण्याचा प्रयत्न होतो. व कालांतराने विषय बाजूला पडतो.

मुंबईकर आगतिक असतो. म्हणून सर्व संवेदना बोथट करून त्याला बाहेर पडायचं लागतं. घर सोडलेला माणूस हाती पायी धड अवस्थेत परतेल याचा भरोसाही नसतो. त्यामुळे हा सलाम त्याच्या धारिष्टला नाही तर अगतिकतेला आहे. असे आम्हाला वाटते. पुढील दहशतवादी घटनेपर्यंत सर्व काही आलबेल असते. आणि अचानक एखादी सकाळ, संध्याकाळ, रात्र यमदूतांना निमंत्रण देणारी ठरते.

मुंबईकराच्या नव्हे तर कोणत्याही शहरातील नागरिकाची नियती 'जगायची पण सक्ती आहे, मरायची पण सक्ती आहे' अशी आहे.

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष सातवे / अंक ९ / ऑगस्ट २००६

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष ११ वे / अंक २ रा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ ११९१
२५४१ ३५४६
Email : perfectprints@vsnl.net

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मराठी भाषेची सद्य:स्थिती आणि सांस्कृतिक जडण-घडण | शं.बा.मठ | ३ |
| २) | भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना | यशवंत साने | ७ |
| ३) | नामगीता | आशा भिडे | १६ |
| ४) | मूल बनून समजून घेण्या ... | सौ. मंजिरी दांडेकर | १८ |
| ५) | कथा आणि मराठी कथा | मोहन पाठक | २० |
| ६) | आमची अभ्यास सहल | मधुरा केतकर | २७ |
| ७) | परिसर वार्ता | संकलित | |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# मराठी भाषेची सद्य:स्थिती आणि सांस्कृतिक जडण-घडण

*मराठी भाषेचा वापर करणे कमीपणाचे मानले जाते, अशा विचारसरणीच्या लोकांनी हा लेख अवश्य वाचावा. तसेच विज्ञान व आध्यात्म यातील विवेकाचा प्रश्नही या लेखात आला आहे.- संपादक*

## स्वभाषेमुळेच स्वधर्माची जाण येते

माझा मराठाचि बोलु कौतुके । परि अमृताते ही पैजा जिंके।
ऐसी अक्षरे रसिके । मेळवीन । ज्ञानेश्वरी
(अ. सहावा - श्लोक १४ वा)

मराठी भाषेला देववाणी बरोबर प्रतिष्ठा मिळवून देणाऱ्या ज्ञानेश्वर महाराजानी श्रीमत् भागवत् गीतेवर टीका ग्रंथ लिहिताना काढलेले हे गौरव-पूर्ण-उद्गार आहेत. मराठी भाषा मी इतकी संपन्न करीन अशा प्रतिज्ञेने सामान्यजनांच्या भाषेत त्यांनी हा ग्रंथ लिहिला. आणि सामान्य जनतेला न समजणाऱ्या भाषेत संस्कृतात दडलेला ज्ञाननिधि मुक्त केला. संत वाङ्मयाकडे पाहिल्यास बहुतेक संतानी आपआपल्या प्रदेशात प्रचलित असलेल्या प्रादेशिक भाषेतूनच सर्व सामान्यांना कळेल अशा पद्धतीने ग्रंथ निर्मिती केली आहे. संत तुलसीदास, कबीर यांनी हिंदी भाषेतून, पुरंदरदास, कनकदास यानी कानडी भाषेतून ज्ञानेश्वर ते तुकाराम यांच्या पर्यंतच्या संतानी मराठी भाषेतून ग्रंथांची रचना केली. थोडक्यात संतजनांनी स्वधर्म व संस्कृती यांची जोपासना स्वभाषेतून केली. त्यामुळे आजतागायत धर्म आणि संस्कृती ही टिकून आहेत.

## स्वराष्ट्र निर्मिती

कबीराचे दोहे, तुलसी रामायण, ज्ञानेश्वरी, तुकाराम, नामदेवांच्या गाथा, एकनाथी भागवत, रामदासांचा दासबोध, पुरंदरदास कनकदास यांची पदे आदी ग्रंथामुळे संपूर्ण भारतभर ईश्वर निष्ठा, स्वदेश, स्वधर्म, स्वभाषा यांचा प्रसार आणि प्रचार होत राहिला. आणि जनमानसात त्यामुळेच देवभक्ती बरोबरच देशभक्ती करण्याची स्फूर्ती निर्माण होऊ शकली. महाराष्ट्रापुरताच विचार करावयाचा झाल्यास वारकऱ्यांचे धारकरी बनले. व त्यातून स्वराज्याची भूमिका विस्तारित झाली. इथे ब्रह्मतेज व क्षात्रतेज हातात हात घालून नांदले. हे सारे घडले त्याचे कारण संतानी घेतलेली स्वभाषेबद्दलची भूमिका. सामान्य जनभाषेच्या माध्यमामुळे स्वभाषेत व्यवहार होऊ लागला. त्यामुळे सामान्य जनतेला ज्ञान सुलभतेने प्राप्त होऊ लागले म्हणून त्यांना सांस्कृतिक जीवनात प्रत्यक्ष सहभागी होता आले. आणि स्वधर्म, स्वदेश, स्वभाषा या साठी जनता प्रयत्नशील राहू लागली.

## इंग्रजी माध्यम

इ.स. १८३६ साली लॉर्ड मेकॉले यांनी भारतात सर्व प्रथम इंग्रजी माध्यमातून शिक्षणाचा पाया घातला. यावेळी त्याने असे म्हटले की जेव्हा इंग्रज हिंदुस्थान सोडून जाईल त्यावेळी गोऱ्या इंग्रजांऐवजी काळा इंग्रज इथे राज्य करील. या इंग्रजी भाषेच्या माध्यमाद्वारे आम्ही येथील जनतेतील अस्मिता नाहीशी करून टाकू. जेणे करून त्यांच्या ठिकाणी असलेली स्वधर्म निष्ठा, स्वभाषा प्रेम, व संस्कृती बद्दलचा सारा अभिमान नष्ट होऊन जाईल. या साठी येथील जनतेला इंग्रजी माध्यमातूनच शिक्षण दिले गेले पाहिजे. त्याची ही गर्वोक्ती किती सार्थ ठरलेली आहे हे आपण सहज पाहू शकतो.

### सुशिक्षितांचा काळ

शिक्षणाचे माध्यम इंग्रजी राहिल्यास आपल्या मुलांना भारतभर कुठेही उत्तम प्रकाराने उपजीविकेचे साधन उपलब्ध होईल. मोठ्या मानाचे स्थान प्राप्त होईल. भारताबाहेरही जाता येईल. या एकाच हेतून प्रेरित होऊन आज बरेचसे पालक आपल्या पाल्याला लहानपणापासून इंग्रजी भाषा शिकविण्याचा आग्रह धरताना आढळतात. एका दृष्टीने त्यांचा हा विचार व्यावहारिक आहे असे मानावे लागेल. इतपत इंग्रजी भाषेचा पगडा आपल्यावर बसलेला आहे. अशा परिस्थितीत प्रादेशिक भाषांना दुय्यम स्थान प्राप्त होत असल्यास त्या बद्दल नवल वाटण्याचे कारणच काय ? किंबहुना प्रादेशिक भाषेत लिहिता वाचता आलेच पाहिजे हा आग्रह धरणे म्हणजे फार मोठे व्यक्तिमत्त्व निर्माण करणाऱ्या इंग्रजी भाषेला मुकण्यासारखे होय. अत एव जरी आम्ही मराठी भाषिक असलो तरी व्यावहारिक भाषा इंग्रजी असल्याने त्याचाच पाठपुरावा करणे योग्य होईल असे वाटत असल्यास काय चुकले ?

### भाषावार प्रांत रचना

लोक भाषेतून राज्य व्यवहार झाल्यास तो सुलभ व सुरळीत होऊ शकेल व तो आपल्याला पूर्णपणे समजू शकेल या कल्पनेने स्वातंत्र्य प्राप्तीनंतर पुनर् रचना करण्यात आली. प्रत्येक प्रादेशिक भाषेला प्राधान्य देण्यात आले व भाषावार प्रांतरचना करण्यात आली. प्रत्येक प्रादेशिक भाषेला राजाश्रय प्राप्त झाला. परंतु लोकाश्रय संपुष्टात आला. त्याचे कारण इंग्रजी भाषेला मिळत असलेले अतिरिक्त महत्त्व. त्यामुळे लोक व्यवहार हे प्रादेशिक भाषेतून न होता इंग्रजी भाषेतून अद्याप होत आहेत. यामुळे एतत् देशीय भाषेला गौण स्थान प्राप्त झालेले आहे. प्रादेशिक भाषेचा संकोच होण्याचे कारण शोधत असताना इंग्रजी भाषेच्या वरचष्म्याबद्दल विचार करणे अगत्याचे आहे. यातून सोईस्कर असा मार्ग काढणे आवश्यक आहे. इंग्रजी भाषेचे ज्ञान करून घेणे वेगळे व सर्व व्यवहारात त्याचाच वापर करणे हे वेगळे. इंग्रजी वा तत्सम परकीय भाषांचे ज्ञान प्राप्त जरूर करून घ्यावे मात्र आपल्या स्वभाषेची गळचेपी कदापि होणार नाही हे ही पाहावे. तरच इंग्रजी भाषेचा वरचष्मा हा कमी करता येईल. नुसती हाकाटी करून नव्हे प्रत्यक्ष सर्व व्यवहार स्वभाषेतून करण्याने हे साध्य होणारे आहे. हा आग्रह सर्वच प्रादेशिक भाषिकांनी धरणे आगत्याचे आहे. तरच प्रादेशिक भाषा टिकतील वाढीला लागतील. आपल्यालाच भाषेबद्दल घृणा असल्यास हे कदापि होणार नाही. नुसते तोंड देखल्या बोलणे हे पुरेसे नाही प्रत्यक्ष कृती हवी.

### भौतिकता व भावजीवन

या देशातील भाषा संकोचाचे इंग्रजी भाषा हे एकमेव कारण आहे असे मात्र मुळीच नाही. ते एक मोठे कारण आहे. आज एकंदर जीवनाचा ढाचाच बदललेला आहे. माणसाला पोटापाण्याच्या उद्योगाव्यतिरिक्त साहित्य, वाङ्मय, सांस्कृतिक जीवन, धर्म, तत्त्वज्ञान आदी गोष्टीकडे लक्ष देण्यास फुरसतच नाही. शिवाय या गोष्टीवाचून त्याचे काही अडत नाही अशी एक सर्व साधारण समजूत पण झालेली आहे. भाकरीचा प्रश्न आधी सोडवला पाहिजे. भाकरी शिवाय माणूस जगूच शकत नाही. हे जितके खरे आहे तितकेच केवळ भाकरीवरच मनुष्य राहू शकत नाही हे ही खरे आहे. त्याला आणखी काहीतरी हवे असते हे विसरून कसे चालेल ? भौतिक जीवन संपन्नते बरोबरच आपले भाव जीवनही समृद्ध व्हावे असे माणसाला वाटत असते. कारण त्याची ओढ सत्य-शिव-आणि सुंदरतेकडे असते. यासाठीच आपले भाव जीवन सुंदर करण्याकडे कल्याणमय करण्याकडे मानव प्रयत्नशील रहातो. या प्रयत्नातूनच माणसाने साहित्य, संगीत, शिल्प आणि चित्र आदी कला निर्माण केल्या. त्यात तो रमू लागला. त्यापासून त्याला ब्रह्मसहोदर आनंद प्राप्त झाला. त्याच्या पुढेही जाऊन चिरंतन आनंदाचा ठेवा मिळवण्यासाठी त्याला इच्छा होऊ लागली, त्यातून धर्म तत्त्वज्ञान संस्कृती आदीकडे ओढ

निर्माण झाली व त्या द्वारे चिरंतन अशा स्वरूपात शांत, सुंदर, समाधानी जीवनाचा तो अनुभव घेऊ लागला. भौतिकशास्त्राच्या साहाय्याने भौतिक जीवनात प्रगती करून घेतल्यानंतर सुंदरतेकडे नेणाऱ्या आध्यात्मिक ज्ञानाने जीवन शांत, समाधानी करून सर्वांगाने परिपूर्ण अशा जीवनाचा आस्वाद माणूस घेऊ शकला.

## दोन्ही ज्ञानशाखा आवश्यक

मानवी जीवन संपन्न सुदृढ व निकोप करण्याच्या दृष्टीने दोन्ही ज्ञान शाखांचा अभ्यास करणे आवश्यक. केवळ तांत्रिक शिक्षणाने अथवा भौतिक शास्त्राच्या अध्ययनावरच न थांबता स्वत:ला आत्मिक आनंद देणारे जे साहित्य आहे त्याचाही अभ्यास करावा लागेल. इंग्रजी भाषेच्या द्वारे भौतिक प्रगती जरूर करून घ्यावी. तसेच साहित्य, धर्म, तत्वज्ञान व संस्कृतीसाठी स्वभाषेचा पुरस्कार करणे योग्य ठरेल. तरच आपले जीवन एकांगी न होता हे सर्वांशाने परिपूर्ण होऊ शकेल. हा विचार सुटता कामा नये. स्वभाषेतून होणारा व्यवहार हाही तितकाच महत्त्वाचा आहे. असा विचार केला जात नाही हे आपले दुर्दैव आहे. केवळ भौतिक संपदेने माणूस राक्षसी वृत्तीचा बनेल व केवळ आध्यात्मिकतेचा पुरस्कार करून स्वस्थ राहणारा अन्नाला मोताद होतो. या दोन्ही गोष्टी मानवाला टाळता आल्या पाहिजेत. राक्षसी वृत्ती वा दरिद्री राहणे हे हीनतचे लक्षण आहे. आपल्याला श्रेष्ठ मानव म्हणूनच जगावयाचे आहे. भौतिक संपन्नतेबरोबर मानसिक दृढताही जोपासली गेली पाहिजे. या देशाचे वैभव वाढविलेच पाहिजे व या देशाची संस्कृती पण टिकविली पाहिजे. ज्ञानभाषा व स्वभाषा या दोन्हीच्या माध्यमातून हे साधता येईल. स्वभाषेला फाटा देण्याने आपला नाश आपणच ओढवून घेऊ. काही वर्षांनी या देशातील भाषांचा विकास हा थांबेल व त्याची सारी जबाबदारी आपल्यावरच राहील. प्रादेशिक भाषा समृद्ध करण्यासाठी सर्व सरकार दरबारी या भाषेचा सरसहा वापर झाला पाहिजे. **शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असणे आवश्यक आहे.** ज्ञानभाषेची जानपछान करून घेण्यासाठी त्या भाषेचा अभ्यास जरूर केला पाहिजे. परंतु ती व्यावहारिक भाषा माध्यम असता कामा नये. हे सर्व जनतेने कटाक्षतेने पाहावे.

## माणूस यंत्र बनलेला आहे

असे घडत नसल्यामुळेच आपले सांस्कृतिक जीवन, धर्म जीवन, आध्यात्मिक जीवन विस्कळित झालेले आहे. आपण केवळ पैसे गोळा करणारे यंत्र झालेलो आहोत. अशी आज परिस्थिती झालेली आहे. या पैशाच्या पुढक्यापुढे आम्हाला दुसरे जीवनच राहिलेले नाही. एवढा जबरदस्त पैशाचा प्रभाव या एकांगी जीवनाने निर्माण झालेला आहे. यालाच भौतिकता म्हणतात. या प्रभावामुळे माणसातल्या साऱ्या कोमल भावना करपून गेल्या आहेत. त्याच्यातील सारी माणुसकी नष्ट झालेली आहे. आम्हाला फक्त भाकरीचे शिक्षण दिले जाते. आपल्याला सांस्कृतिक शिक्षण मिळतच नाही. भाकरीच्या शिक्षणाने आम्ही फक्त हकाची भाषा शिकतो. सांस्कृतिक शिक्षण कर्तव्याची जाणीव निर्माण करते. ह्या भौतिक प्रगत शिक्षणाबद्दल पुनर् विचार करणे आवश्यक आहे.

## विज्ञान व विवेक

विज्ञानामुळे वैयक्तिक जीवनात काही प्रमाणात सुखसोयी निर्माण झालेल्या आहेत. त्याच बरोबर मानवाची प्रचंड प्रमाणात संहार करण्याची क्षमताही विज्ञानाने मानवाला प्राप्त करून दिलेली आहे. म्हणून जीवनात समृद्धता निर्माण होऊन देखील शांत व संतुष्ट जीवन उभे राहिले नाही. त्या साठी सदाचार संपन्न व विवेकी जीवन जगणाऱ्या संत सज्जनांची कासच मानवाला धरावी लागेल. हीच मंडळी अहर्निश मानवाचे हित व कल्याण कशाने साधता येईल याचा मार्ग दाखवितात. जीवनात गटांगळ्या खाणाऱ्या मानवाला मदतीचा हात पुढे करतात व पैलतीरावर नेतात. या करता त्यांची संगती त्यांचे साहित्य

हे उपकारक ठरते. यामुळे आपले सांस्कृतिक जीवन संपन्न होते. त्यातून स्वधर्म, स्वभाषा व स्वराष्ट्र या बद्दलची योग्य अस्मिता जागृत होईल. तरच परकीय भाषा पचवून स्वभाषा समृद्ध करू शकू. **आपली मराठी भाषा संपन्न आहे.** तिच्यात संपूर्ण जीवन विकसित करण्याची क्षमता आहे. भौतिक जीवन समृद्धीसाठी आपण आज स्वभाषेकडे दुर्लक्ष करीत आहोत. याचा विचार सर्वांनी संघटितपणे करण्याची वेळ आलेली आहे. सुबद्ध नागरिक याचा विचार करतील तो सुदिन.

### भाषे संबधीचा दृष्टिकोन

आज भाषा म्हणजे परस्परांचे विचार समजावून घेण्याचे एक माध्यम असे पाहिले जाते. तसेच ज्या भाषेमुळे उपजीविकेचे साधन प्राप्त करून घेण्यासाठी मदत होते ती भाषा शिकण्यायोग्य असा समज आहे. भाषाग्राही पेक्षा श्रेष्ठ आहे. भाषेमुळे होणारे संस्कार, साहित्य व त्यातून निर्माण होणारी संस्कृति या मुळे जीवनाला एक प्रकारचा आधार प्राप्त होतो. साहित्या इतकीच संस्कृती देखील महत्त्वाची आहे. आपले सांस्कृतिक जीवन अक्षुण्ण राहावे ज्या भूमीत आपण जन्मलो ज्या भाषेने आपले जीवन घडले, ज्या भाषेमुळे आपले भाव विश्व व्यापक झाले. ती स्वभाषा बाजूला सारून केवळ ज्ञानाची भाषा या गोंडस नावाखाली केवळ उदरभरणार्थ राबविली. जाणारी परकीय भाषा ही आपल्या संपूर्ण जीवनाचा तावा घेत असताना तिकडे डोळे झाक करून आपण आपल्यालाच फसवित नाही ना हा पुन: एकदा जाणीव पूर्वक विचार करणे फार अगत्याचे आहे.

भाषे संबंधी आपली दृष्टी साफ पाहिजे. ज्ञानभाषा म्हणून इंग्रजी वा तत्सम इतर परकीय भाषेचा चांगला परिचय करून घेतला पाहिजे किंबहुना त्या भाषेवर आपले प्रभुत्वही केले पाहिजे. या भाषेचा उपयोग आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञान या पुरताच मर्यादित ठेविला गेला पाहिजे व आपले इतर व्यवहार हे स्व भाषेतूनच होणे आवश्यक आहे. स्वभाषा हा जीवनाचा पाया आहे, सांस्कृतिक जीवन उन्नतीचा मार्ग आहे. यातून स्वधर्म, स्वदेश या संकल्पना उदय पावतात. व आपले भाव विश्व समृद्ध होत जाते. स्वभाषा व्यवहार म्हणजे स्वतंत्रतेचा व स्वाभिमानाचा व्यवहार, हा भाव उदित होण्यासाठी प्रत्येक भारतीयांनी आपआपल्या प्रादेशिक भाषातून सर्व व्यवहार करण्याचा संकल्प करावा तरच आपले प्राचीन सांस्कृतिक जीवन टिकेल त्यात जोम येईल.

- शं.बा.मठ
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३३ २०३०

- ➪ आंतरराष्ट्रीय कीर्तीचे अर्थतज्ज्ञ डॉ. नरेन्द्र जाधव यांची पुणे विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून नेमणूक झाली. ते विद्यापीठाचे सतरावे कुलगुरू आहेत.
- ➪ प्रसिद्ध व्याख्याते व साहित्य समीक्षक प्रा. निर्मलकुमार फडकुले यांचे २८ जुलै २००६ रोजी वयाच्या ७८व्या वर्षी सोलापूर येथे निधन झाले. १६ सप्टेंबर १९२८ ही त्यांची जन्म तारीख.

# भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना

*वैदिक रचना, विश्वसंकल्पना यांच्या दृष्टीने भारतीय संस्कृतीचा विचार मांडणारा हा लेख, विषयाची संगती लागण्याच्या दृष्टीने वाचकांनी हे सर्व लेख एकत्रित ठेवावेत ही विनंती - संपादक*

## पार्श्वभूमी

दिशा मासिकाच्या मे व जून २००६ ह्या विद्या प्रसारक मंडळाच्या मासिक अंकात 'यज्ञ' ह्या वैदिक संकल्पनेची काही मांडणी केली. त्यांतील प्रमुख मुद्यांची थोडी सुसंगत यादी मांडू या.

१) भारतीय वैदिक संस्काराच्या प्रयोगांत **'अग्नि' व 'यज्ञ'** ह्या दोन वैश्विक संकल्पना वा तत्त्वे आहेत व त्यांच्या आधारावर 'Rituals' 'धार्मिक रुढी प्रक्रिया' आचारल्या जातात. ह्या दोन्ही संकल्पना आजच्या समाजात अत्यंत विकृत, धूसर व अज्ञानी स्वरूपांत जाणल्या व राबवल्या जातात. 'आध्यात्मिक जीवन दृष्टी' ही जवळ जवळ तडीपार केलेल्या अश्या आजकालच्या हिंदू समाजाला त्याच्या **प्रचलित भौतिक विश्वासात** ह्या संकल्पनांचा आध्यात्मिक व भौतिक, या दोन्हींचा, जो संयुक्त, एकात्म उद्देश, विनियोग व लाभ असतो, त्याची सुतराम जाणीव व ज्ञान दिसत नाही. ह्या संकल्पनांचे दिव्य, सत्य स्वरूप न समजल्याने हिंदू समाजाचा जो प्रचंड विश्वास व श्रद्धा, त्यांच्या ऋषी मुनी व परंपरा आचारधर्म ह्यावर मात्र आहे, त्याचा **'बाजारी फायदा' उठवण्यात सध्याच्या सगळ्या धर्मसंस्था व संप्रदाय मशगूल आहेत.** त्यामुळे फुटबॉलच्या ऑलिंपिक मध्ये अर्जेंटिनाला यश मिळावे म्हणून 'यज्ञ, हवि व स्वाहाकार ! किंवा एखाधा भौतिकवादी राजकीय पुढाऱ्याला 'सेक्यूलर पार्लमेंटरी सिस्टिममध्ये' इलेक्शनमध्ये विजय मिळावा ह्या इच्छेने 'अर्ज' भरण्यापूर्वी (कामनापूर्ती साठी) केवळ शुष्क कर्मकांडी पद्धतीने यज्ञ केला जातो, अशी दृश्ये दिसत आहेत. ह्याला 'कामनायज्ञ' असे प्रचलित विद्वान म्हणतात. कोणती कामना? कुणापाशी? यंत्रणा कोणती? 'क्षेत्र' कोणते?



चित्र नं. २ : यज्ञ

२) यज्ञ संकल्पना ही एका चिरंतन एकात्म तत्वावर आधारलेली आहे. पिंड, ब्रह्मांड, प्रकृति, पंचतत्वे (पृथ्वी, आकाश, तेज, अग्नि, वायू, जल वगैरे). ह्या

विश्वातील प्रत्येक अवयव वा वस्तु ही एकमेकांशी अविचल नात्याने बांधलेली आहे व त्या नात्याची जात सहकार्याची व त्यागाची आहे. एखादे यांत्रिक घड्याळ जसे स्प्रिंग उलगडून चालते व शेवटी स्प्रिंग पूर्ण सुटल्यावर पुन्हा किल्ली द्यावी लागते व पुन्हा चालते, तसेच काहीसे बीज, वृक्ष, पाने, फळे व पुन्हा बीज, असे चक्र चाललेले दिसेल. आणि, ह्या 'वृक्ष जीवनाला' 'अश्वत्थाला' भूमी, सूर्य. प्राणवायू, जल, कीटक (मोहर येण्यासाठी क्रिया - Cross Polenation) ह्या सर्व क्रिया एका बांधलेल्या विशिष्ट परस्पर सहकार्य परस्परावलंबी पद्धतीने होत आहेत. युगानेयुगे होत आहेत एकाच्या त्यागातून झिजण्यातून, दुसऱ्याची वृद्धी व त्या वृद्धीतून 'एक विश्वउद्देश' साधला जात आहे. तशीच, मानवी जीवन सृष्टीच्या प्रांतातही आई वडीलांच्या मैथूनातून, वीर्य व ओज ह्यांच्या विनीयोगाने, खर्चाने किंवा अस्तित्व त्यागाने नवीन अर्भकाचा जन्म होतो व त्यापुढे त्या जीवाची वृद्धी होते. पुढे समाजाच्या सहकार्याने, प्रकृतीच्या सहकार्याने यौवन मार्गक्रमण नंतर एखादे जीवनकार्य होते आहे. ह्या जीवनकार्यात समाजाला व निसर्गाला त्याच्या एकात्म व्यापारात त्यागपूर्ण सहकार - वेळेचा, शक्तीचा त्याग व ती शक्ती व काळ संपल्यावर ह्या 'दानशूराचा' मृत्यू !! नाही का हे एक अत्यंत दिव्य अचंब्याचे गुंतांगुतीचे, परस्परावलंबी यंत्र परस्पर सहकार्य संबंध व रचना ?

### शुद्ध यज्ञ संकल्पना

ही 'यज्ञाची संकल्पना' एवढ्या लहान परिच्छेदात वा शब्दांत सांगून संपणार नाही. त्यातील भावात्मक, रसात्मक. Emotional, Temporal व Energy च्या प्रक्रिया, देवाण घेवाण व नाती सांगता सांगता जन्म जाईल.

मग, त्याची प्रतिकात्मक रचना 'यज्ञ ह्या विधी संकल्पनेत भौतिक जगातील कर्मकांडात रूजली आहे. ही एक युक्ती आहे. थोडे आठवून कल्पना करा, त्या ऋषी मुनींची की ज्यांनी ही 'प्रथम अदृश्य व अव्यक्त अशी ही 'रचना' जाणली व त्याची प्रतिकात्मक कल्पना, यज्ञकुंड, समिधा स्वाहाकार, हविद्रव्य, ऋत्विज, वेदमंत्र, सामगायन व अनेक औषधी, वनस्पती व पंचतत्वांच्या काही प्रत्यक्ष परिणामी व काही प्रतिकात्मक पद्धतीने मांडली. आठवावे त्यांचे स्वरुप !!

युगानुयुगे व पिढ्यानपिढ्या ही 'यज्ञसंकल्पना' मानवाच्या आचारधर्मात घालून त्यांना कोणती 'ज्ञानपद्धती व क्रिया संकल्पना आणि जाणीव' युगानुयुगे मानवीसमाजाला तळमळीने सांगावयाची आहे बरे?

मर्त्य, मर्यादित ज्ञानेंद्रिय व कर्मेंद्रिय व सीमित, बंदिस्त बुद्धीच्या मानवाला, ह्या अवाढव्य सृष्टीमध्ये वावरताना जी जीवघेणी भीती ग्रासते त्यापासून केवळ 'खऱ्या म्हणजे सत्य ज्ञानानेच' ह्या भीतीची निरावृत्ती होईल - ह्या विश्वासाने त्या ऋषींनी किंवा कदाचित त्या जगन्नियंत्या शक्तीनेच ही 'निश्वसित' ज्ञानाची गुरूकिल्ली 'यज्ञ' ह्या प्रतिकात्मक व साधना केल्यास प्रात्याक्षिक क्रिया देण्याच्या ताकतीची युक्ती, प्रदान केली आहे. ही विश्वनिर्मातीची अव्यक्तांत व चिरंतन अस्तित्वात असणारी, इच्छाशक्ती, ज्ञानशक्ती व क्रियाशक्तिने संपृक्त अशी यंत्रणा एका छोट्या मानवी बुद्धीला पेलेल व शक्य होईल अश्या 'मॉडेल प्रतिकृती' सारखी बहाल केली आहे. हे त्या वैश्विक क्रियेचे 'मॅन्यूएल' आहे, 'गाईड' आहे. पण, ह्या मॉडेलची संकल्पना पाश्चात्य भौतिक यंत्रासारखी नाही. त्या 'मॉडेलची सर्किट्री' ही एखाद्या निर्जीव लोखंडी वा धातूंच्या तारांनी बांधलेली नाही तर, त्याचा 'Key Board' (त्याची बटने) ही त्या यजमानाच्या आंतरिक 'बायो न्यूरॉलॉजिकल' अश्या सीमित पण दैवी अश्या निद्रिस्त व स्पेशल अशा इच्छाशक्ती, ज्ञानशक्ती व क्रियाशक्ती ह्या भांडवलावर आधारित आहे. पण, जागृत, स्पिरीच्यूअल अवस्थेत ह्या अंतर्गत शक्तीला वैश्विक 'Big Computer' मधील

'Synergy'शी 'क्रेडिट अॅरेंजमेंटने' **'नादानुसंधान - 'गणेशविद्या व दुर्गातंत्र'** वगैरेंच्या ज्ञानाने व स्पंदशास्त्र व गायत्री मंत्रांच्या 'केवल जोडणीने' कार्यान्वित करता येऊ शकते. याला योगविद्या, कुंडलिनी जागृती वगैरे अत्यंत आवश्यक आहे.

पण, ही रचना व सामर्थ्य **'विशेष अधिकाराशिवाय'** प्राप्त होणार नाही, अश्या 'नैतिक बांधीव 'Safety Circurts' विश्वामध्ये' व यज्ञाच्या ऋत्विज व यजमानामध्ये शरीरांत अगोदरच जन्मत:च स्थानापन्न आहेत. ह्या 'सेफ्टी व्हॉल्वज' ह्या 'वैधिक नैतिक तत्त्वांवर आधारावर बांधलेल्या आहेत. त्यामुळे त्यांचा उपयोग, आधार, जागृती हे सर्व 'नियंत्रित' आहे - नीतिमत्तेच्या संकल्पनावर बांधलेल्या अश्या अवस्थेत !!

मला आपल्याशी 'यज्ञ' ह्या वैदिक संकल्पनेसंबधात जो संवाद करावयाचा योजिला आहे, त्याचा प्लॅन थोडक्यात असा.

**आध्यात्मिक यज्ञ संकल्पना**

मुख्य म्हणजे भारतात वेद, उपनिषद, श्रौत गृह्य व इतर यज्ञ कर्मकांडात जे ज्ञान 'यज्ञक्रियेबद्दल' उपलब्ध आहे. ते थोड्या वेगळ्या संकलित तत्वाने मांडावयाचे आहे.

त्यांतील समजुतीचे घोटाळे वेगळे करावयाचे आहेत. ह्या घोटाळयांच्या मागे काही युगाबद्दल, ज्ञानशास्त्रांतील बदल व विस्मृती, सामाजिक व राजकीय बदल, सांप्रदायिक गड व किल्ले ह्यांची ठोस तटबंदी व शेवटी थोडी बुवाबाजी, व्यवहारवाद, बाजारीकरण आहे व ह्या सर्वांच्या मुळाशी अज्ञान व योगभ्रष्टता आहे ह्यांची मांडणी व परिचय करून द्यावयाचा आहे.

त्यानंतर जे मानवी ज्ञानसागराच्या भौतिक काठांवर निर्विकाराने, अनादराने व अज्ञानाने उभे आहेत - थोडे अहंकारी पण आहेत व एका भौतिकवादी, 'रिडक्शनिस्ट पॅरॅडिममध्ये' अडकलेले आहेत अश्या आधुनिक विज्ञानवादी त्यांच्याही प्रांतात-यज्ञ ह्या संकल्पनेची बालप्रतिकृती कोणत्या नवनवीन शोधांमध्ये सापडत आहे - उलगडत आहे ते पहाणे आहे. हा उद्योग अत्यंत आवश्यक बनला आहे कारण 'मूर्ताकडून' 'अमूर्ताकडे', व्यक्ताकडून अव्यक्ताकडे, अरूपाकडून रूपाकडे, 'अभावाकडून भावाकडे', भेदाकडून-अभेद, अद्वैताकडे, (Integral Synthetic, Wholistic View कडे )- आपल्याला संक्रमित व्हावेच लागणार आहे. 'शॉर्ट कट' नाही!! फक्त त्यात गैरसमज, द्वेष, हेत्वारोप, सांप्रदायिकता यावर आधारलेली वृत्ती सत्यज्ञानाकरितां आणि त्याच्या प्राप्तिकरिता टाकावी लागेल. हे संक्रमण केवळ बुद्धीच्या स्तरावर वा व्यवहारावर होणार नसून त्यांत योगक्रिया, कल्पनाशक्ती, रूप बांधणी, 'प्रज्ञा', 'मेधा' ह्या सर्वांचा समुच्चयाने उपयोग, आराधना, साधना व तपस्या करावी लागणार आहे. तेव्हाच आणि केवळ तेव्हाच ह्या अतींद्रिय, आगम तंत्रांची संकल्पना आपल्याला खऱ्या अर्थाने ज्ञात होईल. मगच Textual Knowledge मध्ये अडकलेल्या पंडिताला 'ऋषी ज्ञानापर्यंत' नेतां येईल.

**यज्ञसंकल्पना विकृतीचे कारण**

डॉ. बाळ गांगल ह्यांनी 'यज्ञ' व 'ऋषी' ह्या दोन शब्द संकल्पनाबद्दल जे प्रचलित विभ्रम किंवा विकृत अर्थ सध्या आले आहेत, त्यावर अत्यंत मार्मिक भाष्य केले आहे. ते म्हणातात-

"यज्ञाचा अनुवाद इंग्रजीत 'Sacrifice' केला की मग 'धर बोकड की काप' ह्यापलीकडे आपली विचारशक्ती आणि कल्पनाशक्ती जाऊंच शकत नाही." यज्ञ ही कल्पना अत्यंत उच्च, गूढ, आगम, कल्पनाशक्तीची आहे. ही वचने पहा !!" जो आत्मयज्ञ करतो तो (इतर म्हणजे द्रव्य) यज्ञ करणाऱ्यापेक्षा श्रेष्ठ. (बौधायन

२.७.१२.१५)''

'ब्रह्माधान करणाऱ्या यजमानाचा 'प्राण' म्हणजेच 'गार्हपत्य', अपान म्हणजे 'दक्षिण'. व्यान म्हणजे गार्हपत्य 'आवहनीय' (अग्नि), उदान म्हणजे 'सभ्य' आणि समान म्हणजेच 'आवसथ्य'. हे पाच अग्नि आत्म्याच्या ठायी असतात आणि म्हणूनच (यजमान, खरं म्हणजे) आत्म्यालाच आहुती देत असतो'' बौधायन धर्म सूत्र २.१०.१८.१०) 'ऋषी' म्हणजे (Priest) भटजी नाही. मग कोण? ''गूढ, दिव्य वस्तू आपल्या अंत:चक्षुंनी जो पाहू शकतो तो ऋषी. पण खरा अत्याचार तेव्हा घडतो जेव्हा ऋषी शब्दाचा अनुवादही Priest असा केला जातो.''

ह्याचे डॉ. बाळ गांगल एक मार्मिक कारण देतात.

''युरोपियनांना 'चर्च-बाह्य' अध्यात्म माहीत नसल्याने आणि जो पाद्री तोच धर्मोपदेशक असल्याने त्यांनी आपल्या येथील 'होता' - 'उद्गाता' - 'अध्वर्यू' 'ब्रह्मा' पासून ते 'ऋषी', 'कवि', 'विप्र' सर्वांना 'Priest' [illegible]. आणि आपण ते मुकाट्याने मान्य केले.''

(वेद-अवेस्ता- डॉ. बाळ गांगल २६-१२-१९९३ बृहन्महाराष्ट्र प्राच्यविद्या परिषद, दुसरे अधिवेशन, ठाणे)

तसेच अत्यंत कल्पना - गर्भ-संकल्पना-गर्भ अश्या यज्ञ संकल्पनेचे केवळ शुष्क कर्मकांडात-बहिरंगात' जे आज स्वरूप दिसते आहे त्या स्वरूपांतून आपल्याला मुक्त करावयाला लागणार आहे. बहिरंग केवळ प्रतीकासाठी आहे, - 'कल्पनाशक्ती', किंवा अँटोनियो निकोलस यांच्या शब्दात, 'Act of Imaging'. [illegible] लागणार आहे. 'मंत्रसिद्धि' करायचीच लागणार आहे. त्या शिवाय वैदिक देवताशक्तिंचे आवाहन व सहभाग अशक्य आहे. यजमानाचे 'योगी भूमिकेत' जाणं हे अत्यावश्यकच आहे.

दिशाच्या मे २००६ च्या अंकात एक मुद्दा आग्रहाने मांडला होता की कर्मकांडी यज्ञाच्या आकारात ज्या क्रिया शारिरीक, Physical प्रत्यक्षात, वस्तू वा 'द्रव्य' मार्फत करावयाचा त्याला अनुलक्षुन 'यजमानाने' त्या संदर्भाला अनुसरून कल्पनाशक्तिने व स्वप्रज्ञेने, मेधाशक्तिच्या सहाय्याने स्वत:च्या मनात, अंत:करणात, सहस्त्रारचक्राच्या स्थानी केंद्रित व योग्य षटचक्रांच्या स्थानी अश्या अंतरंगातील क्रिया करावयाच्या आहेत. ह्या अत्यंत प्रगल्भ अश्या मानसिक क्रिया आहेत.

पण, ह्या क्रियेकरितां जी योगकुशल, प्रज्ञावान यजमान अपेक्षित आहे, ती जर सामान्य पातळीवरची अज्ञानी व्यक्ती असेल, तर हा 'यज्ञ' यशस्वी होणार नाही. त्याच्या भोवती ज्या वातावरण निर्मितीची योजना शास्त्रीय कर्मकांडांत - निरनिराळ्या ब्राह्मण ग्रंथांच्या अनुसार केली जाते त्याला 'हा अज्ञानी यजमान' प्रतिसाद देऊ शकणार नाही.

त्यामुळे डॉ. बाळ गांगल म्हणतात त्या आरोपाचा मतितार्थ हा आहे की युरोपियन चर्चसंस्थेचा जो प्रभाव [illegible] त्यामध्ये 'ऋषी' ह्या आचार्य [illegible] Preist म्हणजे 'भटजी' ह्या या स्वरूपांत रुपांतरित प्रत्यक्षात झाला.

यजमान हा एक अज्ञानी, भौतिकवादी यांत्रिक बनला!!

आणि ऋषी 'भटजी' बनला!!

मग 'यज्ञ संकल्पनेचा अध:पात वेगाने झाला व पुनरुज्जीवित होऊ शकला नाही. पण ही स्थिती थोड [illegible] पासून आजतागायत बहुतांशी रूढ झाली आहे व समाजमान्य [illegible] आहे. हा [illegible] आहे!!

**कर्मकांड, ज्ञानकांड, मंत्र भेद**

पण, या पेक्षा जास्त खोलवर व वेगळा असा निष्कर्ष श्री. एम्. पी. पंडित ह्या महायोगी अरविंद घोष यांच्या उत्तम शिष्याने काढला आहे.

**आचार्य जैमिनींनी** जे मीमांसा दर्शन मांडले त्यात वैदिक ज्ञानाला जी कर्मकांडांची (Ritual) बांधीव बैठक दिली व 'ब्राह्मणे', की ज्या मध्ये ह्या कर्मकांडांची विस्तृत व पूर्ण बारकाव्यांसहित शास्त्रसंहिता दिली, ती एका अर्थाने एक सांप्रदायिक वेद प्रणाली बनून राहिली. एकांगी झाली. इतर वैदिक यज्ञांच्या अवयवांचा विसर पडला किंवा दुर्लक्ष झाले. वेदांचा संपूर्ण अर्थ व बोध ज्ञात होण्यासाठी मानवी विचार व बुद्धीला ज्या तीन प्रांतांत मध्ये विहार करावा लागतो. अभ्यास करावा लागतो - त्याचे **तीन - विभाग - ज्ञानकांड, कर्मकांड व मंत्र** असे आहेत. वेदामध्ये ऋचांमध्ये हे तीनही विचार अंतर्भूत आहेत. विखरलेले आहेत. आणि नंतर **ज्ञानकांडाचा पाठपुरावा- बादरायण ऋषीनी केला. पण 'मंत्रशास्त्र' दुर्लक्षित राहिले. अप्राप्य राहिले!!**

एम्. पी. पंडित म्हणतात : -

(Lights in upnishads). 'The mantras, the Hymns of the veda, parent of the Brahmanas including the upanishads, did not receive the attention of any one, separately as a body of original sacred texts : they became settled into oblivion as a living scripture."

"We must remember that the Mantras are not poetical compositions or liturgical verses composed mainly for serving the performance of rituals. The Mantras are the **'seeings', 'dertayah' (द्रष्टयः) of sages and the seers (ऋषी व द्रष्टये), mantra - drastarah (मंत्र- द्रष्टारः)**, who in the course of or in the fruition of their life-long **inner 'askesis', tapascarya (तपश्चर्या)**, perceived or visioned intimately certain truths pertaining to the inner regions of life and spirit and found adequate expression to them in words, which were vouchafed to their inspired hearing, shruti, (श्रुती) on their pristine levels of their unified being, where they came face to face with the **'Powers of the Higher Reality'**. Not intellect but something deeper and higher on the purified reaches of their personality was the origin from which the inspired word broke forth."

The Rishis themselves say in an unmistakable manner that they (or their fore fathers) found, discovered the Riks (ऋचा); to them they are God-given; Indra, Lord of the Heavens of Pure Mind is the promoter of the Kavi (कवि), the seer (द्रष्टा), Indra it is, who carries and delivers the 'word' out of the depths of the ocean of Mind they dug out the mantras, even as they shaped or carved the truth expressions from within their heart.

'इमां धियं सप्तशीर्ष्णीम् पिता न

ऋतप्रजातां बृहतीं अविन्दत् । (R.V.X. 67. I)

देवदत्तम् ब्रह्म (R.V.I. 37.4)

इमां धियं देवीं (R.V. VIII. 18.3)

स इन्द्रः कविर्वृधः वाकस्य वक्षाणिः (R.V. VIII. 52.4)

मनसौ वै समुद्रात-निरखनन् (Shatapatha Br. VII 5.2.52)

इमं स्वस्मै हृद् अ सुतष्टं मन्त्रं वोचेम (R.V.II 35.2)

हृदा यत्तष्टान् मन्त्रान् (R.V.I. 67.2)

**परिभाषिक शब्दाचे खरे अर्थ**

आतां थोडेसे यज्ञाच्या संबधीच्या **'Jargon'** विशेष **'परिभाषामध्ये'** शिरूया. खरे अर्थ प्राप्त करूया!!


'अहिताग्नि' म्हणजे अहित व अग्नि यांचा संधि. 'अहित' याचा अर्थ performed आणि one who

maintains the sacred fire. म्हणजे 'जो पवित्र अग्नि प्रज्वलित ठेवतो. संयुक्त अर्थ a Brahmana who consecrates the sacred fire.

ब्राह्मण म्हणजे 'ब्रह्म' जाणणारा. Consecrates म्हणजे एखादी गोष्ट पवित्र करणारा. एखाद्या गोष्टीला वाटून घेणारा.

वेदांचे अर्थ लावताना या सर्व अर्थांनि ज्या अर्थांची, कृतीची, संकल्पनांची जाणीव होते, त्यांचा संयुक्त, Integral व 'योगिक अर्थ' लावणे हा होय!

तेव्हां, अशीच एक आज हयात असलेली एक व्यक्ती **आहिताग्नि नाना काळे**, (श्री. योगिराज वेद विज्ञान




चित्र नं. १ :

आश्रम, मु. कासारवाडी, बार्शी, जि. सोलापूर महाराष्ट्र) ह्याचे 'श्रौत यज्ञातील देवता ध्यान विचार जाणून घेऊ या. ते म्हणतात :-

१) 'श्रौत यज्ञातील सूक्ष्म प्रक्रियांचा विचार करत असताना - प्राणायाम, ध्यान, धारणा या 'हठयोगातील आवश्यक क्रियांचा अभ्यास यज्ञात भाग घेणाऱ्या 'यजमान-पात्नी व ऋत्विजांना अत्यंत आवश्यक आहे.

**तां योगामिति मन्यते स्थिरामिन्द्रिय धारणम्।।**

**कठोपनिषद - २.३.११**

२) प्रत्येक मंत्राच्या देवतेचे 'यथार्थ ज्ञान' असणे आवश्यकच आहे. - **शौनकीय 'बृहदेवता ग्रंथ'** ''**चर्मचक्षुंना** देवता जरी दिसत नसली तरी त्या देवतेच्या 'प्रगाढ चिंतनाने एकाग्र ध्यानाने 'मन:पटलावर' देवता प्रत्यक्ष समोर असल्याप्रमाणे दिसू लागते.''

''यथा पुरोवर्तिनी देवता '**चक्षुषा**' दृश्यते, ...''

--- सायनाभाष्य

महर्षी शौनक, देवतेचे ज्ञान आवश्यक असल्याचे सांगून अशा यथार्थ ज्ञानाशिवाय केलेल्या 'लौकिक, अथवा वैदिक 'कर्मानुष्ठानाचे, संस्काराचे इष्ट फल प्राप्त होणारच नाही असे आग्रहाने प्रतिपादन करतात.''

असे ज्ञान असणाऱ्यांचाच 'हवि' देवता ग्रहण करतात. ज्याला असे देवतांचे सूक्ष्म स्वरूप ज्ञान नाही त्याचा 'हवि' देवता ग्रहण करत नाहीत.

**''आधारं व्याप्यनाधारं विविच्यात्मान मात्मानि।**
**ईक्षमाणौ शुभौ संधिम् ऋचो दैवतनिलडेत् । ॥१३१॥**

**बृहदेवता**

आधाराच्या बरोबरच अनाधाराच्या रुपात आत्मतत्वाला आपल्याच आत्म्यामध्ये जाणून जो देवताना

जाणतो, त्याने संधि व ऋचा या दोन्हीवरती दृष्टी (लक्ष) ठेवून मंत्रांचा-ऋचांचा पाठ 'उच्चारण' केले पाहिजे अशी व्यक्ति अमर, अनन्त, सत् अशा ब्रह्मतत्त्वामध्ये प्रवेश करते ॥१४०॥

३) वेदमंत्र हेच देवतांचे शरीर मानावे लागते. **ऋचे अक्षरे परमे व्योमन**॥ ऋग्वेद १.१६४

४) देवता ध्यानाला मुख्य आधार म्हणजे - परमात्म्याची विश्वसृजन करणारी वैश्विक **प्राणशक्ति - जागृत करून 'उर्ध्वगामी' करणे.**

५) यजमान व पत्नीची जागृत प्राणशक्ति हाच देवता ध्यान विषयाचा मूलाधार आहे.

**यज्ञ पशुबली?**

आता थोडे यज्ञात **'पशूबली'** देतात असा जो विकृत 'धर्मविधी' एका काळी अस्तित्वात असेल व त्यावर गौतम बुद्धाच्या व आजही समाजसुधारकांच्या प्रखर टीका होतात, त्याबद्दल खऱ्या वैदिक यज्ञामध्ये काय संकल्पना होती ते पाहू या. आतापर्यंत जे वाद झाले त्या दोन्ही भूमिका अत्यंत अज्ञानी, पूर्वग्रही व भौतिकवादी, अभिनिवेशी वा राजकीय, सामाजिक आशयाचा होत्या - वकीली स्तर, राजकीय स्तराच्या होत्या असे लक्षात येईल.

यज्ञाच्या आध्यात्मिक आशय व स्वरुप व संकल्पनेचा जो अध:पात केवळ शुष्क कर्मकांडी झाला. त्याच्यामुळे या वादांचा शेवट आजतागायत होऊ शकला नाही.

त्यामुळे, आहिताग्नि नाना काळे काय सांगतात त्या अभ्यासाकडे लक्ष देऊ या.


पशुबंधामध्ये **''बृषदाज्य''** (दही व तूप मिश्रण) हे हविद्रव्य अर्ध्वर्यु व यजमान दोघांनीही वाणीचे नियमन करून (मौन धारण करून) अन्तर्मुख होऊन मंत्राशिवाय इतर काही न बोलता अवेक्षमाणौ (विशेष प्रकारे 'वृषदाज्यावर' दृष्टि ठेवून **''यासामून्नश्च''** मंत्राने उक्त देवताध्यान करत अनुमंत्रण करावयाचे असते.

या ठिकाणी अध्वर्यु-यजमान दृष्टी, शब्द व ध्यानद्वारा ''वृषदाज्य'' प्राणशक्तियुक्त करत असतात.''

यज्ञांमध्ये पशूबली देत होते की नाही हा वा द आहे. या वादात, या तऱ्हेची अनेक वर्णने जमा करून वकीली पद्धतीने Plaintiff and Defendant यांच्या कोर्टदाव्यातील 'शपथेवरच्या' 'प्रतिज्ञापत्रासारखी' आजवर मांडली गेली आहेत. पण कुठल्याही 'यज्ञ क्रियेचा' हेतू हा देवांना 'हवि' अर्पण करावयाच्या हेतूने केलेला प्रयत्न किंवा संकल्पना आहे हे मान्य व्हावे. त्यांत ह्या पशूयज्ञात **'उपाकरण संस्कार'** आहे हा फार गूढ व आगम संस्कार आहे व त्यासाठीच 'कुंडलिनी जागृत, हठयोगी, राजयोगी अश्या ब्रह्मज्ञानी ऋत्विज व यजमान, पतीपत्नीची आवश्यकता वर्णिली आहे. हा जर सामान्य संस्कार म्हणजे 'खाटीक क्रिया' असती तर तो 'Butcher's Sacrifice' म्हणजे 'खाटकाचा यज्ञ' म्हणला गेला असता. त्याचे पावित्र्य युगानुयुगे मानवी समाजात दृढ व रूढ झाले नसते, निदान सुधारणा प्रवृत्ती हिंदू धर्मात!!

तेव्हा 'पशु' म्हणजे काय? जो भौतिक इंद्रियगोचर जग पाहतो व त्यालाच सत्य मानतो तो असा केला, तर जवळजवळ सर्वसाधारण 'मानवजात' या वर्गीकरणातच सामावेल. त्यांत भौतिकवादी वैज्ञानिक विद्वान व सामाजिक व्यक्ति पण येतीलच. तेव्हा या व्यक्तिची 'शंकर पशूपती' याच्या योगमार्गाने दैवी गुणांत संक्रमण करण्याची युक्ती किंवा योजना सज्ञान आहे असे मानले, तर या 'यज्ञक्रियेतील' अनेक भोंगळ अर्थ, वाद व क्रिया याचा 'परदाफाश' होऊ शकेल. एरव्ही नाही.

'पशुगायत्री' (वामन शिवराम आपटे - डिक्शनरी) A mantra whispered into the ear of an animal, which is about to be Sacrificed."




Ref: Pranava dhanuh sharo hyatma
brahma tat lakshyam uchyate
apramattena veddhavyam
sharavat tanmayo bhavet .

Om-the mystic syllable-is the bow.
the self within,the arrow,and Brahman the target.
One should hit that mark with an undistracted mind, and ,
like the arrow ,become one with it.

MUNDAKOPANISHAD 2.2.4
Thai sculpture
V.R.Sane 2.4.1996
Archer. bmp

चित्र नं. ३ :

पशुपाशाय विद्महे शिरच्छेदाय (विश्वकर्मणे) धीमही, तन्नो जीव: प्रचोदयात् ॥

इथे बळी देण्याचा पशू हा पशुवृत्तीचा मानवी from आहे.

उपाकर्मन - Preparation beginning commencement

उपादान -

1) Withdrawing the organs of Sense perception from the external world and its objects.

2) The material from which anything is made.

3) A mode of expression in which a word used elliptically, besides retaining its own primary sense, carveys another (in addition to that which is actually expressed.

"योग प्रक्रिया म्हणजे यज्ञ क्रियेचेच दुसरे नाव. जो यज्ञ आपण लौकिकांत करतो तो खऱ्या यज्ञाचे बहिरंग आहे. अंतरंग म्हणजे योग. ज्या क्रियेने जीव परिपूर्ण अशी आत्मसत्ता प्राप्त करून घेतो, त्या क्रियेचे नाव योग. ज्याप्रमाणे असीम अनंत परमात्मा परिछिन्न होऊन सीमित होऊन जातो, त्याप्रमाणे सीमित परिछिन्न अशा

जीवतत्वाला असीम अनंत अशा जीवनत्वाला असीम अनंत अशा परमात्म्यात विलीन होऊन जावे लागते. ज्या क्रिया योगाने हे साध्य होते त्याचे नाव योग. तोच 'यज्ञ'!!

### चार यज्ञ

"हे यज्ञ चार प्रकारचे. प्रथम जीवाला आपल्या निज स्वरूपात प्रवेश करून घ्यावा लागतो. यज्ञाचे अनुष्ठान ही क्रमानुसार करावे लागते - याला **'गोमेध यज्ञ'** असे म्हणतात. त्यानंतर नाभीत प्रवेश करणे याचे नांव **'अश्वमेध'**, त्यानंतर हृदयात प्रवेश करणे ह्याचे नाव **'वाजपेय यज्ञ'**, त्यानंतर कूटस्थ सहस्रदल कमळामध्ये प्रवेश होतो त्याचे नाव **'सोमयज्ञ'**. सर्वानंद योगाचे हेच स्थान. या स्थानात अर्हता लुप्त होते. ही क्रिया म्हणजे आत्मसमर्पण-आत्मयज्ञ होय."

आपल्याला अजूनही या विषयात अभ्यास करावयाचा आहे. पण, एक गोष्ट स्पष्ट व्हावयाला हरकत नाही कीं भौतिक स्तरावर असलेल्या मानवाला त्याच्या 'पशूवत इंद्रियगोचर ज्ञानाला' व मनाला "वैश्विक यज्ञ" ही क्रिया पूर्णपणे जाणणे व कृती करणे हे अत्यंत कठिण (Herculean Task (ध्रुवसाधना) आहे. नचिकेताच्या निष्ठेने ती करावी लागणार आहे. ह्या प्रयत्नाला पूर्ण यश प्राप्त व्हावे ही आकांक्षा असल्यास - पूर्वग्रह, सांप्रदायिक दृष्टी 'Paradigun bound interpretation' करून चालणार नाही. आतां, या लोकविलक्षण अश्या 'वैदिक हिंदू संस्कृतीतील' आणि 'भारतीय उपक्रमात्मक' अफाट प्रयानाच्या जवळ पाश्चात्य भौतिकवादी वैज्ञानिक काय मदत करतात, ते पुढच्या लेखांत पाहु या.

यशवंत साने
सोनल अपार्टमेंट, अग्यारी लेन,
ठाणे - ४००६०१.
टे. नं. २५३६८४५०
E-mail : yrsane@eth.net Mbl : 9892046539

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाची
आगामी परिषद
नोव्हेंबर २००६
माहिती तंत्रज्ञान विभाग संयोजित
'लिनक्स, ठाणे २००६'

जोशी बेडेकर महाविद्यालय
पुढील परिषद
बायोएथिक्स्
अर्थात
जैवनीती
या विषयावर
ता. २४-२५ जानेवारी २००७

पुस्तक परिचय

# नामगीता

श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची दैनंदिन अशी ३६६ दिवसाची प्रवचने बहुतेक सर्वांनी वाचलेली असतीलच. काही नित्यनेमाने अखंड रोज वाचत असतील. प्रत्यक्ष ती प्रवचनेच गद्यकाव्य आहेत. तरी पण प्रस्तुत लेखकाला ध्यान अवस्थेत ती पद्यरूपात रूपांतरित करण्याचा स्वत: खुद्द स्वामींचाच आदेश झाला. म्हणून लेखकाने ती आज्ञा शिरसावंद्य मानून स्वतः कवी नसतांना सुद्धा त्याचे रूपांतर करण्य मनावर घेतले, तू काम चालू कर र्म पाठीशी आहे. या स्वामींच्या प्रेरणेने पद्यरूपांतराचे काम चालू झाले, प्रत्येक प्रवचन (एक पान) सहा ते सात श्लोक लिहून एकत्रित करावे हा महाराजांचा संदेश मिळाला. त्याप्रमाणे आधी वाचन व त्यानंतर लेखन चालू केले. बरेच ठिकाणी अडले तरी महाराजच सुचवीत होते. माझ्याकडून लिहून घेत होते. आं बरोबर वर्षभरात हे सर्व प्रवचनांचे पद्य रूप काम पूर्ण झाले.



त्यानंतर नाम, संत, सद्‌गुरू, भगवंत इ. नऊ विषयात मूळ प्रवचनांची मांडणी केली. त्यातील नाम विषयाचे 'नाम महिमा' आणि 'नामसाधना' असे दोन वेगवेगळे अध्याय केले. 'भक्ती व प्रारब्ध' या विषयाचे दोन स्वतंत्र अध्याय यात घातले आहेत. यामुळे संख्या नऊ वरून बारावर गेली. सर्व विषयावरील निरूपणाचे सार म्हणून ''देवापाशी काय मागावे'' नावाचा स्वतंत्र १३ वा अध्याय या 'नामगीतेत' समाविष्ट केला. 'श्रीराम जयराम जयजय राम' हा तेरा अक्षरी जयमंत्र महाराजांना फार प्रिय होता. म्हणून गोंदवलेकर नामगीतेचे अध्यायही नेमके तेराच झाले. हा एक सुखद योगायोगच म्हटला पाहिजे. या नामगीतेला ६५ श्लोकांची 'नामपासष्टी' जोडलेली आहे. (ह्या संपूर्ण नामगीतेचा श्लोक विस्तार (८८८ श्लोक) इतका आहे.) ही नामपासष्टी म्हणजे एकाध्यायी गीताच आहे.

श्लोक अगदी सोप्या भाषेत आहेत. त्यामुळे त्याचा शब्दश: अर्थ न देता प्रत्येक पानाच्या खाली मध्ये मुख्य प्रतिपाद्य भावार्थच थोडक्यात दिला आहे. काही श्लोकांचे भगवद् गीतेतील श्लोकांशी साधर्म्य दाखवले आहे.

श्री. गो. सी. गोखले ज्यांनी महाराजांची प्रवचने संग्रहीत केलीत त्यांची प्रस्तावना या ग्रंथाला लाभलेली आहे. प्रस्तावनेत ते म्हणतात 'गीता' म्हणजे प्रस्तुत लेखकाचा अत्यंत आवडीचा विषय, गोंदवलेकर महाराजांच्या प्रवचनांना .... या स्वरुपात मांडण्याची त्यांची कल्पना खरोखर नाविन्य पूर्ण आहे. प्रवचनांच्या विषयाला गीतेची जोड देऊन ते स्वतंत्रपणे पद्यात लिहिणे ही सोपी गोष्ट नाही. 'भविष्यात मी जेव्हा देहात नसेन तेव्हाही जेथे भक्त नामात मग्न असेल तेथे मी निश्चितच भेटेन.' असे महाराज नेहमी सांगत असत. बऱ्याच भक्तांना तसा प्रत्यय आजही येत असतो. तसा मराठ्यांनाही आला असावा.

प्रस्तुत लेखक पेशाने सिव्हिल इंजिनिअर, त्यांना गीतेची लहानपणापासून आवड त्यांनी लहान वयातच गीता मुखोद्‌गत केली. गीतेचा समश्लोकी अनुवादही त्यांनी

भगवंताच्या स्वप्नांतील आदेशावरून केला. महाराजांच्या प्रवचनांना गीतेचे स्वरूप दिले. ही रचना 'अनुष्टुप' या गीतेच्या मूळ छंदातच केली आहे. नामभक्तांच्या योगदानामुळे या पुस्तकाचे मूल्य माफक ठेवणे शक्य झाले आहे असे प्रकाशकांनी म्हटले आहे.

'समर्पण पत्रिका' सुद्धा १३ श्लोकी पद्यातच आहे. तेरा अध्यायानंतर परिशिष्ट १ - पसायदान (नामगीतेवरील) परिशिष्ट २ - श्री गोंदवलेकर नामगीता - नवनीत (अर्थात नामपासष्टी) परिशिष्ट ३ - समारोप व फलश्रुती.

प्रत्येक अध्यायाला पानभर प्रास्ताविक आहे त्यामुळे नामगीता समजायला सुलभ सोपी झाली आहे. प्रवचनांची गीतेशी सांगड घालून मराठ्यांनी दोघांचा समन्वय साधला आहे. श्री गोंदवलेकर महाराजांनी आपल्या प्रवचनातून रामनामाचा महिमा कळवळून जगाला सांगितला आहे. प्रपंच व परमार्थाची सांगड कशी घालावी हे ही प्रभावीपणे सांगितले आहे. महाराजांचा उपदेश 'भगवान उवाच' सारखे महाराज सांगतात असे दर अध्यायात म्हटलेले आहे. मूळ प्रवचनांचेच विषय नामगीतेत आहेत. त्यामुळे महाराजांच्या भक्तांना ते वेगळे वाटत नाहीत.

+ पहिल्या अध्यायातले हे काही श्लोक बघा -
मार्ग ईश्वर प्राप्तीचे असती दोन मुख्य ते ।
पहिला कर्म योगाचा, संन्यास दुसरा असे ॥४॥
प्रपंच करणे ऐसा भक्तीने योग युक्तिने ।
हे राजगुह्य गीतेचे नामाने साधते सुखे ॥८॥
नसे उपाधी नामाला घ्यावे केव्हाहि ते कुठे ।
सोवळे ओवळे वेळ नामाला बांध तो नसे ॥२०॥
+ अध्याय दुसरा बघा -
नामस्मरण करण्या एकाग्र मन पाहिजे ।
विचार मनि येती जे न द्यावे लक्ष त्यांकडे ॥८१॥
नामात रंगुनी जाता झाला एकान्त पाहिजे ।
होता विसर देहाचा झाले तादात्म्य पाहिजे ॥८८॥

दर अध्यायाच्या शेवटी गीतेप्रमाणेच 'याप्रमाणे श्रीगोंदवलेकर नामगीतेचा 'नामसाधना' नावाचा दुसरा अध्याय समाप्त झाला, असे म्हटले आहे.

'पसायदानाची' ही थोडी झलक पहा - तेरा श्लोकी पसायदानाच्या प्रत्येक श्लोकाच्या सुरुवातीला 'श्रीराम जयराम जयजय राम' या तेरा अक्षरी मंत्राचे प्रत्येक अक्षर लिहिले आहे.

श्रीब्रह्मचैतन्य महाराज, आज्ञा जी केलि आपण ।
करण्या नामगीता ही घेवुनि आपले वच ॥१॥
रामुखे निघाले आपल्या दिव्य जे वचनामृत ।
संपादिले चि गोविन्दें मांडुनि ते व्यवस्थित ॥२॥
मतांच आशय वेचोनी तेरा अध्यायी मांडला ।
रचून नामगीता ही, होताची आपली कृपा ॥३॥

नित्य नामसाधना करणाऱ्यांना ही 'नामगीता' नक्कीच मार्गदर्शक ठरेल. इतरांनाही ती प्रेरक ठरेल. एकाध्यायी गीता म्हणून नामगीता-नवनीत अर्थात (नामपासष्टी) नित्यपाठ म्हणून घेता येईल.

'नामगीता' - मराठे प्र.सि.
मुंबई, केशव भिकाजी ढवळे.
पृ. - १६० मूल्य रु. ५० फक्त

**आशा भिडे**
बी/९ विजय अपार्टमेंट
'आराधना' टॉकीजजवळ
ठाणे (प.) ४०० ६०२
दूरध्वनी - २५४१०१४०

चित्रपालवी


# मूल बनून समजून घेण्या ...

*मुलांच्या अंतर्मनाचा उत्स्फूर्त अविष्कार म्हणजे चित्र ते समजावून घ्यावयाचे असेल तर आपणही मूल व्हायला हवं.- संपादक*

दूर ठेवूनि मोठेपण व्हा,
लहान अमुच्यासाठी
मूल बनून या समजून घेण्या
हासत बाळांसाठी
झगे अकारण प्रौढत्वाचे
अमुच्या अंगी चढवू नका
हास्य आमुच्या वंदनावरचे
दास्य लादुनि दडवू नका
नीती, भीती, रीती यांच्या भिंती
सभोवती बांधू नका
उठता बसता उपदेशांचे
कडवट घुटके पाजू नका
कुतुहल पुरवा मिरवा घेऊन
साता सागरावती...
प्रेम हवे ते द्या आम्हाला,
नटवून सजवून ठेवू नका
पंख पसरू द्या खूप मोकळे
भूक मनाची मारू नका
खेळ हवे ते द्या आम्हाला
मात्र खेळणे बनवू नका
तुमच्या इच्छा आकांक्षांचे
साधन आम्हा घडवू नका,
विशाल गगनासवे घडू द्या
आमुच्या आनंद भेटी...
फुलत्या झुलत्या सृष्टीपासून
दूर आम्हाला ठेवू नका
जुळत्या मिळत्या स्वरतालाला
वंचित आम्हा करू नका
सभ्य शिस्तीचे कुरूप मुखवटे
आमच्यावरती चढवू नका
सहजपणाची निर्मळ सुंदर
वाट आमुची अडवू नका
दिशा सर्व अन् अनंत वाटा
मुक्त आमच्यासाठी, मूल बनून...

राजा मंगळवेढेकरांची ही कविता वाचली अन् वाटले आजची लहान मुले कदाचित हेच म्हणत असतील. कारण आज मोठ्यांनी आपल्या अपेक्षांचं ओझं दप्तराबरोबर या मुलांच्या गळ्यात मारलंय. मुलांना काय हवं आहे हे कोणी लक्षातच घेत नाही. त्यांचं हे कोंडलेलं मन चित्रकलेत मोकळं होतं आणि मुले चित्रातून बोलू लागतात. मोठ्या माणसांप्रमाणे बोलून विचार प्रगट करणं मुलांना जमत नाही म्हणून ती आपलं मनोगत अशा रेषांमधून सांगतात. या रेषा आणि आकार हेच यांचे शब्द. मात्र त्याचा अर्थ मोठ्यांनी नीट समजावून घेऊन त्यांना आविष्काराची जास्तीत जास्त संधी द्यायला हवी.

आपल्या शिक्षणाच्या चौकटीत मुलांना काय वाटते याला आपण फारसे महत्व देत नाही. आपण जे सांगतो, शिकवतो ते त्याने आत्मसात करून, पाठ करून परीक्षेत त्यावर विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे द्यावीत व उत्तम गुणांनी





पास व्हावे ही चाकोरी ठरून गेली आहे. अशा वेळी कला हा एकमेव विषय आहे की, मुलांना काय वाटतं, काय हवं काय सांगावसं वाटतं याला संपूर्ण संधी तर देतोच पण त्याच्या सर्वांगीण विकासाला हातभारही लावतो. ज्यावेळेस मुले चित्र काढतात तेव्हा त्यातून त्यांच्या त्या विषयासंबंधीचे ज्ञान, निरीक्षण, स्मरण आणि त्यासंबंधीचे त्याने आपल्या पद्धतीने केलेले निवेदन शब्दांशिवाय केलेले स्पष्टीकरण, ते वाचावे लागते. त्याच्या दृष्टिकोनातून पहावे लागते. मगच त्यात दिसेल त्या मुलाच्या अनुभवाचा खजिना, विचारांचे भांडार आणि कल्पना विलास.

आजकाल चित्रकला स्पर्धांचे पेव फुटले आहे. मग स्पर्धा आली की मोठ्यांना आवडतील अशीच चित्रे मुलांनी काढावीत अशी अपेक्षा ठेवून मुलांकडून चित्रे घोटून घेतली जातात. पण इथेच सारे चुकते कारण मुले त्यामुळे आपले उत्स्फूर्त विचार स्वत:च्या कल्पनेने काढायचे विसरतात आणि कुणाची तरी नक्कल करून नकलाकार बनतात. त्यात ती आपले स्वत्व विसरतात. सर्जनशीलतेने निर्मिती करण्याऐवजी सराव केलेले तेच तेच चित्र मुले काढू लागतात. त्यामुळे जिज्ञासेने निरीक्षण करून त्यावर विचार करण्याची त्यांची शक्ती क्षीण होत जाते. म्हणून कुठलीही जबरदस्ती मुलांवर न करता त्यांच्या कलाने त्यांना चित्र काढू द्यावे. कारण ती जे काढतात ते त्यांच्या दृष्टीने, कल्पनेने बरोबरच असते. त्यात आपण ढवळाढवळ केली तर कदाचित त्यांचा आत्मविश्वास डळमळीत होईल व आपल्या कल्पना साकार करण्यास ती तयार होणार नाहीत. ती सतत कुणाच्या तरी मदतीवर, आधारावर अवलंबून राहतील. याचा दुष्परिणाम केवळ कला विषयातच नव्हे तर इतर कामातही जाणवेल. कारण कलानिर्मितीमुळे मुलांना केवळ आनंदच मिळतो, असे नाही तर आपणही काही करू शकतो, आपले विचार, अनुभव कल्पना मूर्त रूपात व्यक्त करू शकतो, हा आत्मविश्वास त्यातून मिळतो आणि प्रत्येकाच्या जडणघडणीत आत्मविश्वासचे महत्त्व सर्वाधिक आहे हे कोण नाकारील ?

सौ. मंजिरी दांडेकर
मधु-मिलिंद बिल्डिंग, घंटाळी रोड
नौपाडा, ठाणे (प) ४००६०१.
दूरध्वनी क्रमांक : २५४१ ४५३९

# कथा आणि मराठी कथा

*'कथा' या साहित्य प्रकारावरील संशोधनासाठी श्री. मोहन पाठक यांनी टिपणांच्या आधारे हा लेख आहे. संशोधन मार्गदर्शक प्रसिद्ध समीक्षक कै. प्रा. ला. ग. जोग होते. याची संदर्भसूची बरीच विस्तृत आहे. ती नंतर देण्यात येईल. - संपादक*

**कथा-महत्त्वाची अंगे**

कथा कशी सांगितली जाते वा लिहिली जाते, तिच्या आविष्कृत स्वरूपातील ठळक गोष्टी कोणत्या, हा विचार करता कथेची रचना वा आविष्कार ज्या मूलभूत घटकांच्या आधारे होतो, त्यांचा विचार ओघानेच येतो. या घटकांचा थोडक्यात विचार केला तर कथा म्हणजे काय या मूळ प्रश्नावर थोडा आणखी प्रकाश पडू शकेल.

**कथानक** - कथेला विषय कोणता असतो, वा असावा याचे उत्तर 'कोणताही' असेच देता येते. कारण "कोणत्याही मानवी मानसिक व्यापारात सांगण्यासारखे व ऐकण्यासारखे काही ना काही आढळेलच म्हणून कोणत्याही अशा व्यापारात कथेचे बीज असू शकते."

कथानक निवडल्यानंतर काय सांगायचे व कसे सांगायचे याचा विचार करून वाचकाच्या मनावर एकच एक परिणाम साधू शकेल अशी त्या कथानकाची अभिव्यक्ती करावयाचे कौशल्य साधणे यात खरी कसोटी आहे. व्यक्ती व जीवनातील घटना, प्रसंग यांतून कथा आविष्कार साधावयाचा असतो हे खरे असले तरी त्या मांडणीचा, अभिव्यक्तीचा परिणाम साधणे हे महत्वाचे असल्याने कथानक किंवा कथावस्तू (Plot) हे कथेचे महत्वाचे अंग ठरते. कथेतील आकर्षकता वाढविण्याचे हे काम कल्पनाशक्तीच्या आधारे, संवेदनाक्षम मनाने जीवनातील संघर्ष अचूक हेरणाऱ्या कथाकारास सहज जमू शकते.

तंत्र दृष्ट्या कथानकाच्या मांडणीचे आरंभ, मध्य व शेवट हे तीन टप्पे सांगितलेले दिसतात. या तीनही टप्प्यातून पुढे जाणारे कथानक अधिकाधिक आकर्षक, उत्सुकता वाढविणारे व एक संस्कारी कसे होईल याकडे कथाकाराने लक्ष पुरविणे आवश्यक असते. वाचकाची वा श्रोत्याची जिज्ञासा वाढती ठेवण्याची अनेक तंत्रे संभवू शकतात. उदा. अपेक्षाभंग करून वा ज्याला धक्का तंत्र म्हटले जाते ते वापरून किंवा एखादे रहस्य कथानकात गोवून हे साधता येते.

कथानकात सर्वसाधारणत: सुसंघटितता, रचना, कौशल्य, मौलिकता व आकर्षकता हे गुण आवश्यक असतात. कथा सांगण्याच्या सर्वसाधारण दोन पद्धती रूढ आहेत. एक म्हणजे आत्मनिवेदनात्मक व दुसरी पात्राच्या तोंडून कथानक उलगडत नेण्याची याशिवाय संवादातून वा पत्रांतून कथानक सांगण्याच्या पद्धतीही आहेत.

**व्यक्तिचित्रण** - व्यक्तिचित्रणाचे कथेतील महत्व अनन्य साधारण आहे. हा कथेचा महत्त्वाचा घटक असल्याचे अनेक समीक्षकांनी मान्य केल्याचे दिसून येते. "चांगल्या ललित साहित्याचा व्यक्तिचित्रण हे पाया असते" "कथानकातून व्यक्ती निर्माण होत नाहीत, तर व्यक्तीतून कथानक निर्माण होते", अशा विधानातून या म्हणण्याची साक्ष पटते. कथानकाच्या ओघात येणारे घटना, प्रसंग, भावना यांचे वर्णन हे माणसाच्या स्वभाव विशेषातूनच आकार घेते. सर्वसाधारण सर्वच साहित्यात असे दिसून येते की सुरूवातीला घटनाबहुल असलेली, कथानक प्रधान

कथा कथानकातील गुंतागुंतीकडून व्यक्तिचित्रणातील सूक्ष्मतेकडे विकास पावत गेलेली आहे. या दृष्टीने मराठी कथेच्या सुरूवातीच्या हरिभाऊंच्या कथा ते आजच्या जी. ए. कुलकर्णी, आनंद जातेगावकर, कमल देसाई, मिलिंद बोकील यांच्या कथा हा प्रवास पाहणे उचित ठरते. ना. सी. फडक्यांनी सुरू केलेल्या तंत्र विचाराच्या आसपासच व्यक्तिचित्रणाला महत्त्व देणारी दिवाकर कृष्णांची कथा होती.

व्यक्तिचित्रणाचे वर्गीकरण वेगळ्या पद्धतीने मांडलेले दिसून येते. एकूण साहित्यातील व्यक्तिचित्रण हे इ. एम्. फॉस्टरने गोलाई असणारी व्यक्तिचित्रे (Round characters) व व्यक्तित्वशून्य व्यक्तिचित्रे (Flat characters) असे विभागले आहे. मराठीत ह. ना. आपटे ते फडके-खांडेकर कालखंडापर्यंतच्या कथांत मनोरंजन, उपदेश, उद्‌बोधन अशी प्रयोजने असत. या प्रयोजनांसाठी कथा लिहिली गेल्याने व्यक्तिचित्रणाला साधनापेक्षा अधिक महत्त्व दिले गेले नाही. त्यामुळे या कथांतील व्यक्तिचित्रण एकाच पातळीवरून झालेले दिसते. अशा कथातील व्यक्ती नंतर फॉस्टरच्या Flat व्यक्तिचित्रांच्या वर्गात मोडू लागल्या. दिवाकर कृष्णांची कथा याला अपवाद होती. बाकीच्या कथाकारांच्या कथांतील व्यक्तिचित्रांबद्दल असे म्हणता येईल की, ''व्यक्तिविशिष्ट स्वभावपरिपोषापेक्षा सांकेतिक स्वभावरेखाटनालाच अधिक महत्त्व दिलेले आपल्याला आढळते.''

व्यक्तिचित्रणाबद्दल अर्नेस्ट हेमिंग्वेने ''लेखकाने जगातील माणसांसारख्या दिसणाऱ्या हुबेहुब व्यक्तिरेखा रंगवायच्या नसून ती जिवंत माणसेच वाटली पाहिजेत ही कल्पना मांडली. या शिवाय व्यक्तिचित्रांचे वर्गीकरण विकसनशील (Developing) व अविकसनशील (Static), वर्णनात्मक (Descriptive) व दर्शनात्मक (Dramatic) अशा पद्धतीनेही करता येते. ना. सी. फडक्यांनी व्यक्तिस्वभाव स्पष्ट होण्याकरिता त्या व्यक्तीच्या हावभावादी कृत्यातून तो स्पष्ट व्हावा अशी एक पद्धत सुचवली आहे.

लघुकथेतील व्यक्तिचित्रणावर तिच्या मर्यादित परिघाचा परिणाम होतो. त्यामुळे ''व्यक्ती या तरूण असतात. वृद्धत्वाकडे झुकतात, निरनिराळ्या स्थलांतून वा प्रसंगातून दिसून येतात.'' हे कादंबरीत शक्य असणारे व्यक्तिचित्रण लघुकथेत शक्य होणे नाही. व्यक्तीचे संपूर्ण दर्शन घडविणे लघुकथेत शक्य नसल्याने त्या व्यक्तीचे काही विशेषच लेखकाला लक्षात घ्यावे लागतात.

नंतरच्या साहित्यविचारात मात्र कथेच्या भाषा, व्यक्तिचित्रण, वातावरणनिर्मिती वगैरे अंगाकडे पहावयाचा दृष्टिकोण बदलत गेला. मराठी कथा साहित्यातही ४२ ते ४५ च्या सुमारास कायापालट होत जाऊन एकेका घटकाच्या स्वतंत्र विचारापेक्षा कथेतून व्यक्त होणारा जीवनानुभव महत्त्वाचा ठरला. कथा ही भाववृत्तिदर्शक असते, किंबहुना अशा भावस्थितीचे रेखाटन हाच तिचा हेतू असतो असा दृष्टिकोन बनत गेल्याने कथारचनेचा सांगाडा, कथेस लागणारी काव्यपूर्ण भाषा, कथेत येणाऱ्या विषयांबद्दलचे संकेत इत्यादी तांत्रिक विचारातून कथा मुक्त होऊ लागली; त्यामुळे तिला विविध परिमाणे लाभू शकली. त्यामुळे व्यक्तिचित्रण हा कथेचा महत्त्वाचा घटक असून व्यक्तिविचारातूनच कथा सुचू शकते हे मान्य करूनही मानवी संबंधातील अनाकलनीयता, वैविध्य आणि व्यक्तिस्वभावातील वैविध्य लक्षात घेता व्यक्तिचित्रणाचा ठाशीव साचा, साचेबंद नियम न ठरविणे हेच श्रेयस्कर होय!

**भाषाशैली** - ''कथेच्या एकूण सर्व अंगांचा विचार करीत असताना प्रामुख्याने भाषाशैलीचाही विचार करावा लागतो. कारण कथेच्या सर्वांगाना व्यापणारे असे हे व्यापक तत्त्व आहे'' भाषा म्हणजे विचार व भाव व्यक्त करावयाचे साधन असे म्हटल्यास हे विचार व भाव अभिव्यक्त करण्याची पद्धती म्हणजे शैली असे म्हणता येईल.

कोणत्याही साहित्यप्रकाराला भाषेमुळे व्यक्तस्वरुप लाभते. भाषा शब्दांची बनलेली असते म्हणून कोणताही साहित्य प्रकार हा शब्दबंबाळ असतो असा कयास बांधणे सर्वस्वी चुकीचे ठरते. कारण भावाभिव्यक्तीची प्रत्येकाची पद्धती ही निराळी असते, शैली निराळी असते. त्यामुळे कवितेला अमूक एका प्रकारची, नाटकाला अमूक एकाप्रकारची शैली आवश्यक असते असे गणिती पद्धतीने सांगता येत नाही. ''शब्दांना नाद असतो, वाक्यांना लय असते. अनेक वाक्यांचा मिळून जो परिच्छेद तयार होतो. त्याला प्रमाणबद्धता असते. आणि या तिन्ही गुणांच्या साहाय्याने भाषेत जे सौंदर्य येत त्या सौंदर्यामुळं भाषेची ''शैली'' सिद्ध होते.'' अशी एक व्याख्या ना.सी. फडके यांनी केलेली आहे.

कथा या साहित्य प्रकाराच्या भाषाशैलीविषयी असे म्हणता येईल की कथेची भाषा शैली ही अत्यंत काटेकोर असावयास हवी. एखादे वाक्य वा शब्दही कमीजास्त झाल्यास कथेच्या परिणाम क्षमतेत बाध निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे कथाकाराची भाषाशैली जीवनानुभवाचा प्रत्यय देऊ शकण्यास समर्थ व एकच एक परिणाम साधण्याच्या दृष्टीने सूचक, मितव्ययी असणे हेच योग्य ठरते.

**आकर्षकता** - आकर्षकता हा कथानकाचा गुण असल्याचे यापूर्वीच स्पष्ट झाले आहे. ही आकर्षकता वाचकाची उत्सुकता वाढवीत ठेवून साधता येते यासाठी आरंभ व शेवट आकर्षक असावा. असे असले तरी भाषा शैली, व्यक्तिचित्रण, विषय आदी घटकांबद्दल जसे काटेकोर नियम सांगता येत नाहीत, तद्वतच या गुणाबद्दलही नियम सांगणे कठीण असते. कारण 'दुसऱ्याने ऐकावी' या हेतूने सांगितल्या जाणाऱ्या कथेत (व हा हेतू मूलभूत आहे हे लक्षात घेता) हे दोन गुण उपजतच निर्माण होतात. तोंडा-तोंडी पसरणाऱ्या कथा 'तिखट मीठ लावून' सांगणे हा कथा सांगणाराचा स्वभावच असतो. उदाहरणार्थ उंदराने गणपतीची पूजा केली अशी बातमी 'बातमी' म्हणून छापून आली तर त्या घटनेबद्दल अधिक माहिती असणारे हे केवळ news sense ने ती बातमी सांगणार नाहीत. त्यांच्या सांगण्याची सुरूवात ही आपले कुतुहल जागे करणारी असते व शेवट आपल्या मनावर एखाद्या भावनेचा (येथील उदाहरणात आश्चर्याच्या भावनेचा) परिणाम साधणारा, लक्षात रहाणारा असतो. केवळ बातमी हा परिणाम उत्कटतेने साधण्यास असमर्थ असते. कारण बातमी म्हणून वाचीत असता आपल्याला आश्चर्य वाटले तरी अनेक नवलपूर्ण घटनापैकीच ही एक या विचाराने आपण ती बातमी वाचून हातावेगळी करतो. त्यामुळे वाचकाच्या मनावर साधला जाणारा परिणाम लक्षात घेता कथानकाने सुरूवातीपासून मन आकर्षून घ्यावे व शेवटी मन परिणामाने संपृक्त करावे हे म्हणणे हा संकेताने रूढ असा अनुभवाचा भाग झाला. हे कौशल्य सांगणाराच्या सांगण्यातच समाविष्ट असते.

आकर्षकता वाढविणारा कथेतील आणखी एक घटक म्हणजे शीर्षक. अर्थात अलिकडील साहित्य विचारात शीर्षकाबद्दल दुमत आढळते. शीर्षक कशासाठी हवे असाही प्रश्न उपस्थित केला जातो. आणि शीर्षकामुळे कथेतील आकर्षण क्षमता वाढते या म्हणण्यातही फारसे तथ्य नाही.

शीर्षकवादी विचारसरणीचा सारांश ''शीर्षकाद्वारे कथानकाचा आशय प्रथमदर्शनी स्पष्ट होत असतो. म्हणजेच वाचकांची उत्सुकता-वाचकांचे कुतुहल-वाचकांचे आकर्षण खेचून घेण्याचे श्रेय प्रथम दर्शनी शीर्षकाचेच असते.'' या शब्दात सांगता येईल. समग्र कथानकाची शीर्षकातून कल्पना येईल व त्यातून ती कथा वाचण्याची वाचकाला प्रेरणा होईल, तो कथा वाचण्यास प्रवृत्त होईल - म्हणजेच कथेची आकर्षकता वाढेल असे या विचारसरणीचे सार आहे. फडक्यांनी तर कथेचे शीर्षक हाच तिचा खरा आरंभ या दृष्टीने शीर्षकविचार केला आहे.

याउलट शीर्षक विरोधी विचारसरणीच्या म्हणण्यानुसार शीर्षकामुळे कथेतील आशयाच्या अर्थाच्या शक्यतांचा संकोच होतो. अनेक अर्थवलये निर्माण करू शकणारा आशय हा एकाच शीर्षकामुळे एकाच अर्थाशी संबध्द होतो. शीर्षक लक्षात न घेता साधला जाणारा एखाद्या कथेचा परिणाम व शीर्षक असणाऱ्या एखाद्या कथेचा परिणाम हा कथानकाच्या आकर्षकतेच्या संदर्भात अभ्यासनीय ठरणारा विषय होईल.

या काही प्रमुख अंगांशिवाय निसर्गवर्णन, संवाद, पार्श्वभूमी वगैरे काही घटक टीकाकार मानतात. परंतु कथानकाच्या दृष्टीने भावप्रत्ययी जीवनानुभवाचे संयत प्रकटीकरण असणारी कथावस्तू, व्यक्तिचित्रण व भाषाशैली या तीन प्रमुख घटकांखेरीजचे हे घटक प्रस्तुत व एकूण घटक विचारांच्या संदर्भात कालबाह्य वाटतात.

## कथासाहित्य - वर्गीकरण

कोणत्याही प्राचीन व अर्वाचीन कथेचे वर्गीकरण करीत असता ती कथा कोणत्या प्रकारात नेमकी बसेल याबद्दल मतभेद व वादच अधिक संभवू शकतात...लघुकथा प्रकार मुळात कथा आहे की नाही याचाच वाद आहे. आपल्या अपत्याप्रमाणे आपल्या कलाकृतीचे नामकरण करणे हा लेखकाचा एकट्याचाच हक्क आहे.'' त्यामुळे ''साहित्याचे म्हणून जे आपण वर्गीकरण करतो ते स्थूल स्वरुपाचे असते आणि बहुतेक कलाकृती त्या वर्गीकरणातल्या एखाद्या वर्गात चपखल बसत नाहीत. कारण कोणतीही कलाकृती ही संमिश्र स्वरूपाची असते.'' असे असले तरी विवेचनाच्या सोयीसाठी व विचाराच्या स्पष्टतेसाठी कथेचे वर्गीकरण करण्याची परंपरा पूर्वापार चालत आलेली आहे. वेदकालीन प्रार्थनानंतर सांगितल्या गेलेल्या प्राणिकथा (गरूड आणि सरडा) विश्वोत्पत्तिकथा (मनू आणि महापूर) अशा विविध नावांनी विभागता येतील, अशा कथा दिसतात.

सर्वसाधारणत: कोणतेही वर्गीकरण हे एका विशिष्ट पायाभूत तत्त्वावर आधारलेले असते. कथा साहित्याच्या वर्गीकरण पद्धतीतील प्रमुख तत्त्वे व त्यावरून केले जाणारे उपप्रकार यांचा त्रोटक विचार 'कथा' या विषयाच्या विवेचनात महत्त्वाचा ठरतो. ''अशी वर्गीकरणे साधारणपणे स्वरूप, आशय व प्रयोजन किंवा कार्य यावर आधारित असतात.'' शिवाय आकृतिमूलक, कथनमूलक, कालसापेक्ष संकल्पनामूलक व परंपरेनुसार विषयाधिष्ठित अशी ही वर्गीकरणाची पायाभूत तत्त्वे असतात. या वर्गीकरणांतील प्रमुख अडचण म्हणजे कोणतेही एक तत्व प्रमाण मानले तर इतर तत्त्वांकडे दुर्लक्ष होते; इतर तत्त्वेही विचारात घ्यावयाची तर, प्रत्येक तत्वानुसार एकच कथा अनेक वर्गात बसू शकते.

प्राचीन भारतीय संस्कृत साहित्य समीक्षकांनी कथेचे कथा व आख्यायिका असे दोन मुख्य भेद मानलेले आहेत. यातील फरक हा की कथा ही कल्पनाधिष्ठित असते, तर आख्यायिका वास्तव, इतिवृत्तात्मक असते. याबाबत प्रमुख साहित्याचार्यांनी मानलेली वर्गीकरणे.

आनंदवर्धन :- परीकथा, सकलकथा व खंड कथा असे तीन प्रमुख प्रकार आनंदवर्धनाने मानलेले दिसतात. यातील खंडकथा व आजची प्रादेशिक कथा यात साम्य आहे. हेमचंद्र :- काव्यानुशासनात गद्यांतर्गत कथेचे हेमचंद्राने पुढील दहा प्रकार मानलेले दिसतात. १आख्यानम् २निदर्शनम् ३प्रवल्हिका ४मतल्लिका ५मणिकुल्या ६परिकथा ७खंडकथा ८सकलकथा ९उपकथा व १०बृहत्कथा. हरिभद्राचार्य :- हरिभद्राचार्याने आपल्या वर्गीकरणात चार प्रकार सांगितले आहेत. ते अर्थकथा, कामकथा, धर्मकथा, संकीर्ण कथा या चार नावांनी त्याने सांगितलेले दिसतात. दिघानिकाय :- ब्रह्मसूत्रात ज्यांना एकत्रितपणे भवाभव कथा या नावाने संबोधले आहे, त्या कथांचे त्याने २६ प्रकारात वर्गीकरण केले आहे.

हे प्राचीन वर्गीकरणाच्या अनुषंगाने आलेले विवेचन झाल्यानंतर आधी नमूद केल्यानुसार प्रमुख तत्त्वांनुसार होणाऱ्या उपप्रकारांचा त्रोटक विचार येथे करावयाचा आहे.

आकृतिमूलक वर्गीकरण - या तत्त्वानुसार केलेल्या वर्गीकरणात कथेचे चार प्रकार होऊ शकतात. १) संपूर्ण गोष्ट २) दीर्घकथा ३) लघुकथा ४) लघुतम कथा

१) **संपूर्ण गोष्ट :-** संपूर्ण गोष्टीचा लेखक हा सर्वसाधारणत: सर्व तपशीलांसह कथा लिहितो. काही गोष्टी गृहीत धरून वाचकाच्या कल्पनाशक्तीवर तो न विसंबून राहता अनुभव विषयाचे इत्थंभूत वर्णन करीत राहतो. अनुभवाच्या अनुषंगाने येणाऱ्या सर्वच तपशीलात संपूर्णता आणावयाचा त्याचा प्रयत्न असतो. हरिभाऊंच्या 'काळ तर मोठा कठीण आला,' 'थोड्या चुकीचा घोर परिणाम' अशा कथा या प्रकारच्या संदर्भात लक्षात घेता येतील. २) **दीर्घकथा** - संपूर्ण गोष्ट व दीर्घकथा या नामाभिधानात वरकरणी साम्य वाटले तरी त्यांच्यात मूलभूत फरक आहे. संपूर्ण गोष्टीचा व दीर्घकथेचा आकारही क्वचित सारखा असू शकेल. तरी संपूर्ण गोष्टीची बांधणी बांधेसूद, एकात्म नसते त्यामुळे परिणाम कारकतेवर परिणाम घडू शकतो दीर्घकथा परिणामाच्या दृष्टीने एकात्म व बांधेसूद असते ३) **लघुकथा** - लघुकथा ही आकाराने लहान तर असतेच, शिवाय तिच्यातील जीवनदर्शनाचा आवाका व एकरोकी परिणामकारकता ही तिची खास वैशिष्ट्ये. गाडगीळांच्या 'किडलेली माणसे', बाबूराव बागुलांच्या 'भूक' या लघुकथांचा या संदर्भात विचार करता येईल ४) **लघुतम कथा** - आकाराने फारच लहान असूनही मनावर परिणाम घडवून आणण्याची क्षमता या कथाप्रकारात असते. हा कथाप्रकार चुटकेवजा असतो, यातील अनुभवचित्रण ही चुटकेवजा असते.

**कालसापेक्ष वर्गीकरण** - सर्वसाधारणत: जुने व नवे साहित्य ही वर्गवारी या वर्गीकरणात केली जाते... ''आज जे नवीन आहे ते उद्या जुने होणारच. शिवाय एखादी कथा नवीन आहे या गोष्टीला वाङ्मयीन मूल्य तसे पाहिले तर काहीच नाही.'' असे असले तरी... ''मनुष्य हा जसा भूतकाळाचा बंदिवान आहे तसाच भूतकाळाविरुद्ध बंड करणारादेखील आहे. प्रत्येक मनुष्य 'या सांकेतिक कल्पना मी काय म्हणून स्वीकाराव्या ? त्या खऱ्या कशावरून ?' असे प्रश्न स्वत:ला विचारीत असतो, आणि काही अंशी या सांकेतिक कल्पनांपासून मुक्त होत असतो'' यामुळे कथा साहित्यातील रूढ संकेत बाजूला ठेवून नव्याने कथा लिहिली जाण्याचा प्रयत्न होत असतो. यातूनच जुनी व नवी कथा असा भेद संभवतो. या 'नव्या' कथेचा जन्म काळाच्या गरजेपोटी झालेला असतो. ''जे नव्याने जन्माला येत असते ते काही उगीच जन्माला आलेले नसते. ते जन्माला यावे असेच काहीतरी घडलेले असते व म्हणूनच ते जन्माला येत असते.'' आकृतिमूलक वर्गीकरणही कालसापेक्ष आहे.

**निवेदनमूलक वर्गीकरण** - निवेदनाच्या कोणत्या तंत्राचा उपयोग केलेला आहे यावरून हे वर्गीकरण संभवते. प्रथम पुरुषी किंवा आत्मचरित्रात्मक, तृतीय पुरुषी किंवा चरित्रात्मक, संवादात्मक, पत्रात्मक असे काही उपप्रकार या वर्गीकरणाचे म्हणून सांगता येतात.

विषयमूलक वर्गीकरण - प्राचीन परंपरेपासून आजवर सर्वमान्य ठरलेले असे हे तत्त्व आहे. या वर्गीकरणानुसार कथेचे प्रकार सीमित करण्याचे काम अशक्य आहे. कथेचे विषय असंख्य असू शकतात व त्या विषयांना विशिष्ट वर्गात बसविणे हे म्हणूनच कठीण ठरते. परंपरागत अशा रससिद्धांताचा या वर्गीकरणास आधार देता येतो. उदाहरणार्थ एखाद्या हेर कथेतून धाडस हाच प्रमुख विषय मनावर ठसणार असेल, तर त्या विषयात वीर रसचा पाया आहे असे म्हणता येईल. याप्रमाणे पाहू जाता शोक रसातून कारुण्याचा परिणाम घडविणाऱ्या, शृंगार रसातून प्रेमकथा निर्माण झालेल्या दिसतात. अर्थात ''ही नावे मुद्दाम

संस्कृत परंपरा लक्षात घेऊन आलेली नाहीत. ही नावे आंतर्विषयनिष्ठ आहेत...''

काही प्रमुख वर्गीकरण तत्त्वांचा व त्यावर आधारित अशा उपप्रकारांचा ओझरता निर्देश विषयाच्या अनुषंगाने केलेला आहे. या तत्त्वांवर आधारित अशा मराठीतील काही प्रमुख कथा प्रकारांचे स्वरूप दृष्ट्या विवेचन करणे योग्य ठरेल. पण यासाठी सर्वच प्रकार लक्षात घेता येणार नाहीत. यातील काही प्रकारांतील ऐतिहासिक प्रवाहांच्या दृष्टीने विचार पुढे करावयाचा आहे.

**मनोविश्लेषणात्मक** - या कथांची मूळ प्रेरणा मानसशास्त्राच्या विकासातच आहे. मनोव्यापारात चालणाऱ्या असंख्य, दुर्बोध, गुंतागुंतीच्या विचारप्रवाहांच्या अभ्यासाला मानसशास्त्राने दिशा दाखविली. यामुळे माणसाच्या बोलण्याचालण्यावरून त्याच्या आंतर्विश्वातील त्याच्या मनाची सखोलता, अगम्यता यातून कथाविकासालाही विस्तृत क्षेत्र मिळत गेले. सुप्त, अर्धसुप्त, उघड अवस्थेतील मनाच्या हालचालींचा वेध ही या कथांतून घेता येणे शक्य झाले. अशा प्रकारच्या कथातून 'मी' च्या माध्यमातून आत्मानुभूती स्मृतीच्या किंवा संस्मरणाच्या स्वरूपात मानसचित्रांचे विश्लेषण केलेले असते. या नव्या प्रकाराने कथेतील आशयघनता वाढविली. कारण या ''नवकथेतील प्रतिमा, अलंकार यातील नावीन्य उघडपणेच तपशीलात्मक नसून आशयाशी असलेल्या त्याच्या संवादित्वात एकजीवपणातच आहे.''

**ग्रामीण कथा** - नागर व ग्रामीण संस्कृतीतील भिन्नतेवरून हा प्रकार रूढ झाला. केवळ लोकसंख्येच्या आधारे ग्रामीण व नागर असे भेद करणे चुकीचे ठरते. सांस्कृतिक दृष्ट्याच ग्रामीण व नागर समाज वेगवेगळ्या पातळीवर असतो. ग्रामीण समाज हा तुलनेने स्थिर संस्कृतीचा असतो. परंपरेने घालून दिलेल्या चाकोऱ्यांतून ग्रामीण जीवनात लोकाचार, अंधश्रद्धा, रूढी यांना तेथील समाजजीवनात अनन्य साधारण महत्त्व आलेले असते. त्यामुळे साहजिकच ग्रामीण समाजाची आचारविचार पद्धती, भाषापद्धती यात व नागर समाजात तफावत असते. ग्रामीण जीवनाची अनुभूती घेणाऱ्या लेखकाची अभिव्यक्ती या सर्वांतून वेगळी होते व कथेच्या उपप्रकारात ग्रामीण कथा हा उपप्रकार संभवतो.

**भावकथा** - इंग्रजीतील Mood Story या शब्दाचे हे भाषांतर आहे. या प्रकारच्या कथेत मनाच्या एखाद्या भावस्थितीचे सूक्ष्म चित्रण अभिप्रेत असते. एखाद्या भावविशेषाभोवती एका लयीत कथा गुंफली जाते. या कथांचे विषय अमूर्त भावसौंदर्य, मानसिक संघर्ष चित्रित करणारे असतात. कथेच्या व्याख्येत पाहिल्याप्रमाणे एकच एक परिणाम घडवून आणण्याच्या दृष्टीने भावकथांचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे.

**विनोदी कथा** - अतिशयोक्त वर्णन, जीवनातील विसंगती, उपहास गर्भता, शाब्दिक चमत्कृती या सर्वांतून जीवनात घडणारे विनोद हेरून त्या विनोदाची गुंफण कथानकात केल्याने विनोदी कथा हा प्रकार निर्माण होतो. एखाद्या व्यक्तिमत्त्वातही विनोद असू शकतो, तसाच तो प्रसंग, शब्द यातूनही प्रत्ययास येऊ शकतो. या स्वरूपाचा विनोद असणाऱ्या कथा हास्यभावनेतून निर्माण होतात. सुखनाट्याबद्दल डॉ. सदा कऱ्हाडे यांनी. ''वास्तवांतर्गत जीवनाच्या, प्रसंगांच्या किंवा वस्तुमात्रांच्या सामान्य मर्यादांच्या संबंधात जाणीवपूर्वक अन्योक्तीने किंवा अतिशयोक्तीने बोलण्यामागचा एक सद्हेतू असा असतो की या मर्यादांचे जाचक, लहरी व अंतिम नसलेले स्वरूपच प्रदर्शित व्हावे ते प्रदर्शित झाले म्हणजे माणसाला पुन: जीवनाला आवश्यक अशा तार्किक सुव्यवस्थेचा विचार करता येतो'' असे सांगितलेले दिसते. हा हेतू एकूणच विनोदाचा म्हणून सांगता येईल. साहजिकच कथातून

येणाऱ्या विनोदी चित्रणामागील अन्वयार्थही याच हेतूत शोधता येतो.

**वैज्ञानिक कथा** - विज्ञानाचा मानवी जीवनावर झालेला परिणाम दुसऱ्या महायुद्धानंतर फारच ठळक होत गेलेला दिसतो. विज्ञानामुळे शक्य झालेली प्रगती, त्यातील माणसाचे लागतेपण, प्रगतीच्या पुढील शक्यता, माणूस व विज्ञान या सर्वांचा विचार मानवी कल्पनेला स्फुरण्यातून वैज्ञानिक कथा हा प्रकार निर्माण झाला. विज्ञानाचे एखादे तत्त्व, एखादा शोध, भविष्यात लागू शकतील असे शोध अशा कथातून विषय म्हणून येतात. इंग्रजीतील Science Fiction याला 'वैज्ञानिक कथा' हा पर्यायी शब्द आहे.

याशिवाय प्रेम कथा, श्रृंगार कथा, भूत कथा, वीर कथा, साहस कथा, कौटुंबिक, सामाजिक, ऐतिहासिक कथा, धार्मिक कथा, नीतिकथा, उपदेशकथा, रहस्यकथा, तत्वप्रधान कथा असे किती तरी प्रकार कथासाहित्यात दिसून येतात. पण सुरूवातीलाच स्पष्ट केल्याप्रमाणे आनुषांगिक स्वरूपामुळे या विषयाच्या विवेचनाला मर्यादा घालणे आवश्यक ठरते.

**मोहन पाठक, ठाणे**

## 'दिशा' संपर्क

विद्याप्रसारक मंडळ,

डॉ. बेडेकर विद्यामंदिर, तळमजला,

नौपाडा, ठाणे ४०० ६०२.

दुरध्वनी - ०२२२५४२६२७०

## आवाहन

+ विद्याप्रसारक मंडळाच्या सर्व घटक संस्थांनी, संस्था प्रमुखांनी आपल्याकडे होणाऱ्या सर्व लहान मोठ्या कार्यक्रमाचे वृत्त (छायाचित्रासह) परिसर वार्तासाठी विद्याप्रसारक मंडळाच्या कार्यालयात पाठवावे. 'दिशा' तून त्यांची नोंद होणे आवश्यक आहे.

+ सर्व महाविद्यालये, सार्वजनिक ग्रंथालये यांनी "व्ही. पी. एम्. दिशा" ची वार्षिक वर्गणी रु. २५०/- फक्त भरावी.

+ विद्या प्रसारक मंडळाच्या घटक संस्थातील माजी विद्यार्थ्यांनी दिशासाठी देणगी दिली तर स्वागतच आहे. लाखो विद्यार्थी जर ठरवतील. तर दिशा स्वयंपूर्ण होऊ शकेल.

**संपादक**

# आमची अभ्यास सहल

*मे महिन्यात प्राच्य विद्या अभ्यास संस्थेने शालेय विद्यार्थ्यांची इंग्लंडमधील वस्तुसंग्रहालये पहायच्या दृष्टीने एक विशेष सहल नेली होती. त्या सहलीचे वर्णन करणारा हा दैनंदिनीतील नोंद स्वरूपातील लेख. - संपादक*

७-५-०६

दि. ६ मे २००६ रोजी आम्ही सर्वजण सहार विमानतळावर येऊन पोहोचलो. दुसऱ्या दिवशी सकाळी ६.४० चे विमान होते. तोपर्यंत आम्ही गप्पा मारल्या, तसेच थोडा वेळ झोपलो. सुमारे तीन वाजता आमचे, तसेच आमच्या सामानाचे चेक इन झाले. एक अर्ज ही आम्ही भरला व विमानप्रवासासाठी तयार झालो.

प्रथम आम्ही मुंबईहून कुवेत विमानतळावर उतरणार होतो, त्यासाठी कुवैत एअरवेजच्या विमानात आम्ही बसलो. विमान आकाशात उड्डाण करताना खूप मजा आली. खाली उतरताना थोडासा त्रास झाला, पण तेव्हा मोक्षदा ताईने खूप मदत केली. कुवेत विमानतळावर विमान उतरल्यावर आम्हाला काही तास थांबायचे होते. कुवेतहून लंडनच्या 'हिथ्रो' विमानतळावर जाणारे विमान १२.३०ला सुटणार होते, परंतु प्रत्यक्ष उड्डाणास थोडा उशीर झाला. या प्रवासात पहिल्या प्रवासापेक्षा जास्त वेळ लागणार होता, विमानात खूप मजा केली. यावेळी विमान उतरताना पहिल्याप्रमाणे त्रास झाला नाही. हिथ्रो विमानतळावर डॉ. विजय बेडेकर आम्हाला भेटले. तेथून सामान घेऊन आम्ही बस-स्टॉपवर आलो. बसमधून त्या नव्या शहराचे, तेथील नव्या निसर्गाचे नव्या हवामानाचे दर्शन घडत होते, परंतु झोपही खूप येत असल्यामुळे त्या सगळ्याचा नीट अनुभव घेता आला नाही. जसजसा अंधार पडत होता, तसतशी थंडी वाढत होती. रात्री ९च्या सुमारास आम्ही ऑक्सफोर्डला पोहोचलो. तेथून सामान घेऊन आम्ही युथ हॉस्टेल वर दाखल झालो.

८-५-०६

काल रात्री किती पटकन व गाढ झोप लागली हे मला आज सकाळी उठल्यावर कळले. ६ वाजण्याच्या आधी मला जाग आली. मग मी माझे आवरता आवरता सगळ्यांना उठवले. सर्व आवरून आम्ही ७.३० वाजता नाश्ता करण्यासाठी डायनिंग हॉल (बोट हाऊस) मध्ये गेलो. भारतीय जेवणाशी तुलना करता ते पदार्थ तितकेसे रूचकर वाटले नाहीत. काल रात्रीपासूनच पाऊस पडत असल्यामुळे रेनकोट घालावा लागला. आमच्या हॉस्टेलपासून चालत चालत, शहरातील ब्रॉडस्ट्रीट व हायस्ट्रीट या प्रमुख रस्त्यांची ओळख करून घेत, आखीव रेखीव चित्रांसारख्या इमारतींचे फोटो घेत आम्ही Queen's college मध्ये येऊन पोहोचलो. ऑक्सफोर्ड म्हणजे महाविद्यालयांचेच शहर. त्यातील हे एक जुने व मोठे, महत्वाचे कॉलेज. येथील महाविद्यालयांची रचना साधारण कशी असते हे आम्हाला पाहायला मिळाले. महाविद्यालयात Chapel (चर्च सारखे प्रार्थनाघर), डायनिंग हॉल, ग्रंथालय व अभ्यासाच्या खोल्या हे मुख्य भाग असतात. तेथे शिकणारे बहुतांश विद्यार्थी तेथेच राहतात, त्यामुळे एका कॉलेजात विद्यार्थ्यांची संख्या मोठी नसते. कॉलेजचा परिसर हिरव्यागार झाडांनी व फुलझाडांनी बहरलेला असतो. झाडांमुळे परिसर शांतही राहतो व अभ्यासास उपयुक्त वातावरण तयार होते. डॉ. बेडेकरांकडून ही सर्व माहिती घेऊन आम्ही बोल्डिअन ग्रंथालय बघायला गेलो. तेथे एका बाईंनी आम्हाला त्या ग्रंथालयाची, तेथील बांधकामाच्या वैशिष्ट्यांची तसेच तेथील पुस्तके कशी जपून ठेवली जातात, (Chain बांधून ठेवतात) याची

माहिती दिली. खरे म्हणजे ग्रंथालयात (वाचकांना त्रास नको म्हणून) इतरांना येऊ देत नाहीत, परंतु सुदैवाने त्या दिवशी आम्हाला आत जायला मिळाले. त्यानंतर आम्ही विद्यापीठ महाविद्यालयाच्या भव्य चर्च मध्ये गेलो. तेथे संगीतासाठी बासरीसारखे वाद्ये होती. भिंतीवर इतिहासातील विविध चित्रे होती. अनेक लोकांना बसता येईल अशी सोय होती. चर्च पाहून झाल्यावर आम्ही हटफोर्ड महाविद्यालयात गेलो. त्या आधी या महाविद्यालयाचा एक माजी भारतीय विद्यार्थी गौतम आम्हाला भेटला होता. त्याने व तेथील बाईंनी त्या महाविद्यालयाची माहिती करून दिली. नंतर आम्ही त्या इमारतीच्या अनेक पायऱ्या चढून गच्चीत येऊन पोहोचलो. तेथून संपूर्ण ऑक्सफर्ड शहराचे सुंदर दर्शन घडत होते. त्यामुळे आम्ही वरून खूप फोटो काढले. त्या गच्चीतून सर्व दिशांनी उंच-उंच इमारतींची दृश्ये पाहून घेतल्यावर आम्ही त्या महाविद्यालयाच्या भोजन कक्षात गेलो. हटफोर्ड महाविद्यालयाने त्या दिवशी आम्हाला जेवणाचे खास आमंत्रण दिले होते. तेथील जेवणाचा आस्वाद घेऊन (आणि त्या पदार्थांची भारतीय पदार्थांशी तुलना करून) आम्ही तेथून निघालो.

पीट रिव्हर्स संग्रहालय व नॅचरल हिस्ट्री संग्रहालय ही दोन संग्रहालये शेजारी-शेजारीच आहेत. आधी आम्ही पीट रिव्हर्स संग्रहालय बघितले. तेथील एका प्रमुख माणसाने सुरूवातीस आम्हाला संग्रहालयातील वस्तू कशा मांडल्या आहेत, ते सांगितले. त्या वस्तू कोणत्या पद्धतीने मांडाव्यात, भौगोलिकरीत्या मांडाव्यात का, हे आमच्या समोरील मोठे प्रश्न असतात, असे त्यांनी सांगितले. संग्रहालयातील वस्तू वेगवेगळ्या देशांतील, संस्कृतींतील व कालखंडांतील होत्या. अनेक प्रकारची वाद्ये, मूर्ती, होड्यांचे नमुने, दागिने, हत्यारे, ताईत व इतर अंधश्रद्धेच्या गोष्टी, कपडे व इतर उपयोगी वस्तू- उदा. चरखा, आग पेटवण्याची साधने, भांडी इत्यादींचा त्यांत समावेश होता. बासरी, तबला इत्यादी भारतीय वाद्ये व इतर वस्तू तेथे पहावयास मिळाल्या, प्रत्येक वस्तूच्या खाली तिचे नाव व माहिती लिहिलेली होती. पण ते सर्वच वाचण्याइतका वेळ नव्हता.

लगेचच आम्ही नॅचरल हिस्टरी संग्रहालयात आलो. पृथ्वीवरील उत्क्रांतीसंबंधीच्या वस्तू व माहिती तेथे होती. अगदी आदी जीवांपासून माणसांपर्यंतच्या उत्क्रांतीतील छोटे-मोठे टप्पे, त्यांची वैशिष्ट्ये, त्यांतील फरक येथे मांडलेले आहेत. डायनासोरचे मोठे सांगाडे, पशु-पक्ष्यांच्या बनवलेल्या प्रतिकृती, अपृष्ठवंशीय प्राण्यांची उदाहरणादाखल ठेवलेली चित्रे, पशु पक्ष्यांच्या उत्क्रांतीनुसार मांडलेल्या कवट्या व हाडे हे सारेच पाहण्यासारखे होते. हे संग्रहालय पाहून झाल्यावर आम्ही परतीच्या वाटेला लागलो. येता येता डॉ. बेडेकर आम्हाला संग्रहालयांचे महत्त्व समजावून सांगत होते. संग्रहालये हा त्या लोकांच्या शिक्षणातील महत्त्वाचा व उपयुक्त भाग बनला आहे. व म्हणूनच आपल्या देशातही अशा विविध विषयांवरील संग्रहालयांत वाढ केली पाहिजे, असे आम्हाला कळले, येता येता आम्ही इंडिया इन्स्टिट्यूट सारख्या अनेक संस्था पाहिल्या. आपल्या पारतंत्र्याच्या काळात आपल्या देशातील संस्कृतींचा अभ्यास करण्यासाठी निर्माण झालेल्या या संस्थेच्या जुनी व नवी अशा दोन्ही इमारती आम्ही बाहेरून पाहिल्या, फोनकार्ड घेतले.

संध्याकाळी ७ वाजता यूथ हॉस्टेल मध्ये जेवण करून आम्ही आमच्या खोलीत आलो व दिवसभरात पाहिलेल्या गोष्टींची उजळणी केली.

९-५-०६

कालच्याप्रमाणे नाश्ता करून आम्ही ९ वाजता बाहेर पडलो व चालत चालत अश्मोलिअन संग्रहालयामध्ये पोहोचलो. हे एक फारच मोठे संग्रहालय होते. त्यात अनेक दालने होती व प्रत्येक दालन इजिप्शिअन, ग्रीक, भारतीय अशा संस्कृतीसाठी ठेवले होते. दुर्दैवाने भारतीय दालन हे दुरूस्तीच्या कारणासाठी बंद असल्याने आम्हाला बघायला

मिळाले नाही. इतर दालनांमधील विविध मूर्ती, भांडी, हत्यारे, देवदेवता, स्तंभ व इतर अनेक वस्तू माहितीपूर्ण होत्या. कित्येक तास पाहत राहता येईल असे हे संग्रहालय होते. परंतु वेळेची मर्यादा असल्याने लवकरच आम्ही तेथून निघालो व हिस्ट्री ऑफ सायन्स संग्रहालयामध्ये आलो. या संग्रहालयात घड्याळे, चुंबकसूची, पृथ्वीचे गोल, दुर्बिणी व अशी अनेक पूर्वीपासून वापरली व तयार केली गेलेली वैज्ञानिक उपकरणे होती. तो प्रचंड मोठा तीन मजली संग्रह पाहून आम्ही थक्कच झालो. इमारतीच्या तळमजल्यात रेडिओचा शोध लावणाऱ्या मार्कोनी या शास्त्रज्ञाची माहिती देणारे प्रदर्शन पाहिले. हे संग्रहालय पाहून झाल्यावर आम्ही जेवणासाठी थांबलो. तेथे मी खाण्याआधी बासरीवर 'कुहू कुहू बोले कोयलिया' हे गाणे वाजवले. जेवण झाल्यावर आम्ही तेथेच जवळच असलेले एक चर्च पाहिले. त्यानंतर थोडा वेळ खरेदी करण्यासाठी आम्हाला मोकळा दिला होता.

कॅमेऱ्यासाठी एक रोल खरेदी करून मी व इतर सर्वजण ठरल्याप्रमाणे ऑक्सफर्ड सेंटर ऑफ हिंदू स्टडिज या संस्थेच्या प्रवेशद्वारापाशी पोहोचलो. हिंदू धर्माची अशी संस्था इथे आहे हे कोणालाही (इतरांना) कळू नये, म्हणून बाहेर मोठा फलक वगैरे लावला नव्हता. आम्ही हिंदू धर्माचेच असे खालील फोनवरून कळवल्यावरच आम्हाला आत येऊ दिले. ख्रिश्चन समाजापासून वाचण्यासाठी ही व्यवस्था असल्याचे आम्हाला नंतर कळले. या संस्थेमध्ये काही इंग्लिश माणसेच हिंदू धर्माचा अभ्यास करतात. त्यांनी आपला धर्म, नाव, चालीरीती सारे काही बदलले आहे. आपल्याकडेही मिळणार नाहीत, अशा अनेक हिंदू ग्रंथांचा संग्रह तेथे आहे. हिंदू धर्म स्वीकारलेल्या अशाच तेथील एका माणसाने आम्हाला संस्थेची, तेथे कसा अभ्यास केला जातो, इत्यादींची माहिती करून दिली. त्याचे विचार ऐकताना त्याचा हिंदू धर्माविषयीचा आदर जाणवत होता. त्याच्याशी बातचीत करून झाल्यावर आम्ही आधी हॉस्टेलवर येऊन जेवलो व हिस्टरी ऑफ सायन्स संग्रहालयामध्ये पुन्हा येऊन बसलो. तेथे ७.३० वाजता प्रोफेसर पदार्थविज्ञावर व्याख्यान होते. ऑक्सफर्डमध्ये पदार्थ विज्ञानाला पूर्वीपासून कसकशा घडामोडी झाल्या आणि त्यामुळे प्रयत्न करूनही या विषयात Oxford ची प्रगती का झाली नाही ही माहिती त्यांनी दिली हे आम्हाला नंतर समजले, कारण प्रत्यक्ष व्याख्यान ऐकताना कठीण उच्चारांमुळे सगळे समजले नाही. पण ते प्रोफेसर अतिशय मुद्देसूदपणे, नेमक्या शब्दात आणि लक्षपूर्वक तो विषय हाताळत होते, हे जाणवत होते. व्याख्यान ऐकून आम्ही परत येत असताना रॅडक्लिफ कॅमेरा नावाची इमारत बाहेरूनच पाहिली रॅडक्लिफ नावाच्या माणसाने पूर्वी येथे विज्ञानासंबंधीच्या पुस्तकांचा संग्रह केला होता. परंतु आता येथे सर्वच विषयांवरील विविध पुस्तके मिळतीत. फिरत फिरत आम्ही जुन्या ऑक्सफर्ड गावात आलो. तेथे भटकताना तेथील जुनी पण अजूनही सुस्थितीत असलेली बांधकामे व विविध फुलझाडे पाहायला मिळत होती. हॅले धूमकेतूला ज्याचे नाव मिळाले आहे, त्या शास्त्रज्ञाचे, हॅलेचे निवासस्थान आम्ही तेथे पाहिले. त्यानंतर मात्र आम्ही परतलो, कारण उजेड असल्याने अजून फिरावेसे वाटते, पण प्रत्यक्षात ८ वाजून गेलेले असतात.

१०-५-०६

आज दुपारी केंब्रिजला जायला निघायचे असल्याने नाश्ता करण्याच्या आधीच बॅग भरून ठेवली होती. मग रोजच्याप्रमाणे नाश्ता करून आम्ही बसने वनस्पतीचे उद्यान बघायला आलो. तेथे फुलझाडे, फळझाडे, शोभेची झाडे, निवडुंग, सुचिपर्णी झाडे, पाण्यातील कमळांसारखी झाडे इत्यादींचा खूप मोठा संग्रह होता. तो जसा त्या बागेला समृद्ध करत होता तसाच सुशोभितही करत होता. अजूनही विविध झाडांची भर त्यात घातली जात असल्याचे दिसत होते. या बागेत मी अनेक फोटो काढले. आकर्षक वैशिष्ट्यपूर्ण व आपल्याकडे न पाहायला मिळणाऱ्या झाडे-

झुडुपे-वेलींचे मी त्यांच्या नावाच्या पाट्यांसकट फोटो काढले. प्रत्येक झाडाजवळ पाटीवर त्याचे नाव व वैज्ञानिक नाव लिहिले होते. त्या बागेजवळ झाडांची नर्सरी सुद्धा होती. परंतु तेथील रोपे किंवा बिया मी घेऊन आले असते, तरी ती झाडे आपल्याकडे वाढतील की नाही याची खात्री नव्हती.

वनस्पती उद्यानाच्या सौंदर्याचा आस्वाद घेऊन झाल्यावर आम्ही एज्युकेशनल इन्स्टिट्यूट ऑफ ऑक्सफर्ड सेकंडरी स्कूलमध्ये आलो. तेथील एक अधिकारी श्री. गार्सन यांनी आम्हाला तेथील प्राथमिक व माध्यमिक शिक्षणपद्धती समजावून सांगितली. ते स्वत: ब्रिटिश नसून कोणत्यातरी दुसऱ्या प्रांतातील होते, त्यामुळे त्यांचे उच्चार इतरांपेक्षा जास्त कळत आहेत, असे वाटले. आम्हीही त्यांना आपल्या देशातील शिक्षणाची पद्धत सांगितली. आपल्याकडील १० वी म्हणजे तेथे O Level असते व १२ वी म्हणजे A Level असते.

दुपारी ३ वाजताची केंब्रिजला जाणारी बस आम्हाला पकडायची होती. त्यासाठी लंच पॅकेज व बॅग वगैरे सामान वसतिगृह मधून घेऊन आम्ही बस स्टॉपवर आलो. बसमध्ये बसल्यावरच जेवण केले. वाटेत बसमधून पुन्हा एकदा ऑक्सफर्ड शहराचे दर्शन घडले. दूरवर पसरलेली पिवळीधमक (बहुतेक तिळाची) शेते दिसली. थोड्याच वेळात आम्ही त्या शहराचा निरोप घेतला व मजल-दरमजल (अर्थात बसमधून) करत केंब्रिज शहरी पोहोचलो. बस स्टॉपपासून वसतिगृह बरेच लांब असल्याने आम्हाला सामान घेऊन चालत जावे लागते. आमच्या खोलीत जरा स्थिरावल्यावर, मी खाली गेले असता मला आगरकर सरांकडून न्यूटनचे तीन नियम ऐकायला मिळाले (हे शहर ऑक्सफर्डच्या तुलनेत एवढे सुंदर वाटले नाही.)

११-०५-०६

आज हॉलमध्ये आलो, तेव्हा श्रीमती सिमॉण्डस तेथे हजर होत्या. त्यांनी आमच्याशी मनमोकळेपणाने गप्पा मारल्या. त्यांच्याकडील शिक्षणातल्या काही समस्याही सांगितल्या. तेथे विद्यार्थी बऱ्याचदा शिक्षकांचे ऐकत नाहीत, मग शिकवणे कठीण होते, तुमच्या देशातही असेल होते का, असे त्यांनी विचारले. त्यानंतर आम्ही बसने साइट-सीईंग केले.

फिटझ्विल्यम संग्रहालयापासून आम्ही सुरुवात केली, इतर संग्रहालयांप्रमाणे येथील संग्रहसुद्धा मोठा व प्रेक्षणीय होता. येथील भांडी व ताटल्यांचा संग्रह मला फारच आवडला. त्यांतील विविधता अतुलनीय होती. वेगवेगळ्या प्रकारचे युद्धसाहित्यही तेथे होते. चिलखत, जिरेटोप, तलवारी, खंजीर, भाले, धनुष्य-बाण, बंदुका यांचे विविध देशातील नमुने मिळवून तेथे ठेवले होते. संग्रहालय पाहून झाल्यावर आम्ही विद्यापीठ ग्रंथालयात आलो. त्या भव्य इमारतीवरूनच तेथील पुस्तकांच्या संग्रहाच्या भव्यतेची कल्पना येत होती. नियमांप्रमाणे आम्हाला आतमध्ये जाता आले नाही. परंतु तेथेच तळघरात चालू असलेले कवी डांटे याच्या माहितीचे प्रदर्शन पाहावयास मिळाले. 'डिव्हाईन कॉमेडी' ग्रंथ त्याने लिहिला, एवढीच माहिती आम्हाला पुस्तकातून (इतिहासाच्या) मिळाली होती. या प्रदर्शनात त्याच्या जन्मापासून संपूर्ण जीवनप्रवासाची माहिती वाचावयास मिळाल्याने ज्ञानात चांगली भर पडली.

आम्हाला एक चॅपेल बघायचे होते. त्याच्या शेजारीच एक अमेरिकन सीमेटरी म्हणजे स्मशान होते. त्याही ठिकाणाची वाखाणण्यासारखी स्वच्छता, हिरव्यागार गवताने व रंगीबेरंगी फुलझाडांनी केलेले सुशोभीकरण पाहून मला आश्चर्य वाटले. बाहेर झेंडा मात्र इंग्लंडचाच फडकत होता. तेथील चॅपेल अतिशय सुंदर होते. आतमध्ये भिंतीवर दुसऱ्या महायुद्धात केल्या गेलेल्या हल्ल्यांची माहिती नकाशाच्या स्वरुपात दाखवली होती. चॅपेलच्या रम्य परिसरात आम्ही दुपारचे जेवण घेतले व डबल-डेकरने

पुढील प्रवासाला निघालो बसच्या वरच्या मजल्याला छत नव्हते, त्यामुळे गार-गार वाऱ्यात व फुलांनी हळूच गुदगुल्या करून जाणाऱ्या झाडांच्या फांद्यांबरोबर डबल-डेकरमधून जाताना खूप मजा येत होती.

लोककला संग्रहालय बघण्यासाठी आम्ही उतरलो. या संग्रहालयाची दालने घराच्या खोल्यांप्रमाणे होती व तेथील वस्तूही पूर्वी किंवा आता बहुतेकांच्या घरी आवश्यक असतील अशाच होत्या. त्यांत भांडी चमचे, शेगडी, काठ्या यांपासून पियानो, शोभेच्या वस्तू, केसांचे टोप यांपर्यंतच्या वस्तुंच्या अनेक प्रकारच्या नमुन्यांचा समावेश होता. संग्रहालयाच्या खाली खेळणी व इतर छोट्या-मोठ्या वस्तूंचे दुकानही होते. तेथेही थोडा वेळ फिरून झाल्यावर आम्ही निघालो व पुन्हा डबल-डेकरमधून जाण्याचा आनंद लुटत वसतिगृहावर आलो. आज लवकर परतल्यामुळे संध्याकाळी थोडी वेळ खेळांची मजा लुटली.

१२-५-०६

आमचा आजचा संपूर्ण दिवस विविध विषयांवरील संग्रहालयाचाच होता. खरे म्हणजे, आधी आम्ही स्कॉट पोलाट संग्रहालय बघायला गेलो होतो, पण ते सकाळी बंद असल्यामुळे केंब्रीज विद्यापीठाचे भूगर्भशास्त्र संग्रहालय बघायला गेलो. तेथे विविध प्रकारचे व रंगांचे दगड, जीवाश्म, शंख व शिंपले, उत्खननात सापडलेले प्राण्यांचे संपूर्ण सांगाडे किंवा काही भाग यांची रेलचेलच होती. हत्ती, रानम्हैस यांसारखे काही प्राणी सध्या पृथ्वीतलावर कुठेकुठे आढळतात, त्यांची वैशिष्टये कोणती अशी माहितीसुद्धा त्यांच्या सुळे, शिंगे यांच्याबरोबर दिलेली होती. ते सारी पाहून झाल्यावर केंब्रीज विद्यापीठाच्या जीवशास्त्र संग्रहालयात आलो. भूगर्भशास्त्राच्या संग्रहालयाच्या अगदी जवळच ते होते. तेथे अमिबापासून आधुनिक मानवापर्यंत प्रत्येक प्राण्याची प्रतिकृती बनवून ठेवलेली होती. व त्यांची माहिती, वैशिष्टये लिहिलेली होती. पक्ष्यांच्या प्रतिकृती तर इतक्या अप्रतिम बनवल्या होत्या, की ती संपूर्ण शो केस जिवंत भासत होती व पुन्हा पुन्हा पाहावीशी वाटत होती. अतिशय सूक्ष्म प्राण्यांच्या शरीराची रचना मोठी करून समजावून दिली होती, तसेच रोगकारक जीवांची जीवनसाखळी ही स्पष्ट केलेली होती. दुसरे दालन तर संपूर्ण सांगाड्यांची रचना, दोन प्राण्यांच्या सांगाड्यांतील फरक दाखवण्यासाठीच होते. छोट्या-मोठ्या पक्ष्यांपासून प्रचंड आकाराच्या डायनॉसोर पर्यंत आणि उंदीर-सरड्यापासून माकड-माणसापर्यंत सर्वांचे कृत्रिम सांगाडे तेथे कल्पकतेने मांडलेले होते. नॅचरल हिस्टरी संग्रहालयापेक्षा प्राणिजगतातली अधिक सविस्तर माहिती या संग्रहालयात साठवून ठेवलेली आहे, असे वाटले.

यानंतर दुपारचे जेवण करून विद्यापीठाचे मानववंशशास्त्र व पुरावस्तु संग्रहालय बघितले. येथे आदिमानव वापरत असलेल्या दगडाची हत्यारे व हस्तिदंताच्या दागिन्यांपासून सुरु झालेल्या त्याच्या उन्नतीची सर्व माहिती प्रदेशांनुसार दिलेली आहे. आवश्यक तेथे नकाशेही काढून दाखवले आहेत. तेथे दिलेल्या पुष्कळ माहितीपैकी सगळीच माहिती काही तेवढ्या वेळात वाचता आली नाही. परंतु जास्तीत जास्त वाचण्याचा प्रयत्न करून आम्ही निघालो व स्कॉट पोलाद संग्रहालयाला आलो. तेथे ध्रुवीय प्रदेशासंबंधी व अंटार्क्टिका खंडांवरील मोहीमांसंबधी माहिती दिलेली होती. याचबरोबर मोहीमांसाठी लागणाऱ्या खास साधनासामुग्रीबद्दलही सांगितलेले होते. आतापर्यंत कोणकोणत्या देशांनी त्या खंडावर मोहीमा केल्या व कोणकोणती संशोधनकेंद्रे स्थापन केली हे सारे दाखवणारा एक मोठा नकाशा सुद्धा तेथे होता. मोहीमांमधील फोटो होते, पेंग्विन व इतर वैशिष्ट्यपूर्ण पशु-पक्ष्यांची माहिती होती, तसेच या मोहीमांतील कामगिरीसाठी दिली जाणारी पदकेही होती, हे सारे काही जरा नवीनच होते. ते बघून झाल्यावर आज किती ज्ञान व वेगवेगळ्या गोष्टी पाहायला मिळाल्या, असा विचार करत आम्ही सगळे वसतिगृहावर आलो.

१३-५-०६

आज पुन्हा एकदा डबल-डेकर बसने साइट-सीईंग करणार होतो. त्यासाठी आधी बॅटमन स्ट्रीट वरून चालत निघालो. जाता जाता केंब्रिजचे वनस्पती उद्यान बाहेरूनच पाहिले. नंतर बसने प्रवास करून किंग्ज महाविद्यालय व ट्रिनीटी महाविद्यालय ही केंब्रिजमधील दोन महत्त्वाची महाविद्यालये पाहिली. ट्रिनीटी महाविद्यालय म्हणजे गुरुत्वाकर्षणाचा सिद्धांत मांडणाऱ्या न्यूटन या शास्त्रज्ञाचे महाविद्यालय. भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधीही याच महाविद्यालयामधून शिकून आल्या होत्या. असे कळले. भारतात व इतर देशांतही मोठी कामगिरी करून दाखवणाऱ्या किंवा उच्च पदे भूषवणाऱ्या अशा अनेक व्यक्ती केंब्रिज शहरातील महाविद्यालयामधून तयार होऊन गेल्या आहेत असे डॉ. बेडेकरांनी सांगितले. किंग्ज महाविद्यालयाचे चॅपेल पाहून झाल्यावर आम्ही नदीच्या काठावर आलो. तेथून किंग्ज महाविद्यालय व त्याच्या आजूबाजूच्या इमारतींचे, सुंदर परिसराचे सुरेख दृश्य दिसत होते. त्याचे फोटो काढून झाल्यावर थोडा वेळ नदीच्या काठावर फिरलो. रंगीबेरंगी फुलांमुळे तो परिसर रमणीय वाटत होता. पाण्यात होड्यांबरोबरच बदकेही पोहताना दिसत होती. बदक हा त्या देशात जवळजवळ सर्वत्र आढळणारा पक्षी होता, हे माझ्या एव्हाना लक्षात आले होते. काम नदीवर त्या भागात एक छोटा पूल होता. भूमित्रिय पूल असे नाव असणारा तो पूल एकदा पार करून आलो व आम्ही चालत चालत वसतिगृहाकडे निघालो. वाटेत येरगुडे सरांनी आम्हा सर्वांना आइसक्रीम दिले ते चवीने खात खात आम्ही हळूहळू चाललो होतो खरे, पण सकाळी असलेले निरभ्र आकाश आता एकदम बदललेल होते. पावसाची लक्षणे दिसू लागल्याने घाई करायला हवी होती, आता आपण भिजणार याची जाणीव झाली, तेव्हा सर्वांनी चालण्याचा वेग वाढवला. आम्ही वसतिगृहामध्ये पोहोचायला आणि पाऊस सुरु व्हायला एकच गाठ पडली. आम्ही सुटकेचा नि:श्वास टाकला आणि पावसाला म्हटले, ''आता कोसळ हवा तेवढा..!''

पण अजूनही पाऊस जास्त पडून चालणार नव्हता. आम्हाला लगेचच लंडनला जायला निघायचे होते. आम्ही पटापट दुपारचे जेवण उरकले व सकाळीच भरून ठेवलेले सामान घेऊन रेल्वे स्टेशनची वाट धरली सुदैवाने यावेळी पाऊस बंद होता, त्यामुळे सामान भिजले नाही. रेल्वेतून सुमारे दीड तासाचा प्रवास करून आम्ही उतरलो तेथेच डॉ.बेडेकरांनी आम्हाला निरोप दिला व ते भारतात परतले. पुढचा प्रवास भुयारी रेल्वेने करायचा होता व्हिक्टोरिया लाईनने तो होणार होता. मेट्रोचा प्रवास हा आमच्यासाठी नवीन आणि वेगळाच अनुभव होता. दुसऱ्या दिवशी सगळीकडे मेट्रोनेच जायचे असल्याने त्या प्रकाराची ओळख करून देण्यासाठी मुद्दाम आज मेट्रोने आणले आहे, असे कळले. स्टेशनपासून जवळच असल्यामुळे लवकरच आम्ही भारतीय वाय.एम.सी.ए. मध्ये पोहोचलो खूप दिवसांनी भारतीय जेवण करताना बरे वाटले.

१४-५-०६

कालच भारतात परत गेल्यामुळे आजपासून डॉ. बेडेकर आमच्याबरोबर नव्हते. शिवाय कोणतेतरी महत्त्वाचे काम असल्याने आगरकर सरही आज आमच्याबरोबर येऊ शकणार नव्हते. पण एका नव्या व्यक्तीशी आज आमची ओळख होणार होती व त्याच्याबरोबर आम्ही विविध ठिकाणांची माहिती करून घेण्यास जाणार होतो. ती व्यक्ती म्हणजे बेडफोर्डचे श्री. गोडबोले होत. सकाळी नाश्ता झाल्यावर आगरकर सरांनी आम्हाला मेट्रोची तिकिटे काढून दिली व ते कामासाठी निघून गेले. ही तिकिट आम्हाला रात्री १२ पर्यंत मेट्रोच्या किंवा बसच्या कोणत्याही प्रवासासाठी चालणार होती. श्री. गोडबोले आलेले होतेच. आमच्या प्रमाणे अजून एक भारतीय, मराठी कुटुंबही श्री. गोडबोले यांच्याकडून माहिती ऐकण्यासाठी येणार होते. ते आल्यावर

गोडबोले सरांनी आधी स्वत:ची ओळख करून दिली व आपला हा उपक्रम कसा आणि कधीपासून सुरू झाला, ते सांगितले. मग आम्ही मेट्रोने वेगवेगळ्या ठिकाणी जाऊ लागलो. हे नवीन सर काय काय दाखवणार आहेत याची उत्सुकता तर होतीच, पण मेट्रोमधून जात असल्यामुळे सावध राहण्याची गरज होती. आपण बसलेले नसलो आणि कसल्याही आधाराशिवाय उभे असलो, म्हणजे आपण करकचून दाबल्या जाणाऱ्या ब्रेकमुळे पडतोच!

दिवसभरात गोडबोले सरांनी लंडन मधील भारतीय स्वातंत्र्यालढ्याशी संबंधित सर्व ठिकाणे दाखवली स्वातंत्र्यवीर सावरकरांनी ज्याच्यापासून स्फूर्ती घेतली व ज्याचे चरित्र लिहिले, त्या मॅझिनी या इटालियन क्रांतिकारकाचे लंडन मधील घर प्रथम पाहिले. त्यानंतर सावरकर, मदनलाल धिंग्रा, श्यामजी कृष्णा वर्मा, लोकमान्य टिळक इत्यादींच्या लंडन मधील वास्तव्याच्या काळातील त्यांची राहण्याची ठिकाणे बघितली. इंडियन हाऊस ही श्यामजी कृष्ण वर्मांची संस्था पाहिली. मदनलाल धिंग्रांनी कर्झन वायलीचा खून केल्यावर ज्या तुरुंगात फाशी दिले गेले, तो तुरुंगही पाहिला. गेल्याच वर्षी स्वातंत्र्ययुद्धाच्या इतिहासाचा अभ्यास झालेला असल्याने गोडबोले सरांनी सांगितलेले सगळे समजत होते. शिवाय प्रत्येक ठिकाणी ते लिहून ठेवलेल्या खास गोष्टी वाचून दाखवत असल्यामुळे कुठेही ऐकायला किंवा वाचायला न मिळणाऱ्या गोष्टीही कळत होत्या. लोकमान्य टिळकांचे लंडनला येणे ही अशीच एक गोष्ट. व्हॅलेंटाइन चीरोल नावाच्या माणसाविरूद्ध टिळकांचा न्यायालयीन खटला चालू होता. त्यासाठी त्यांना काही काळ लंडनमध्ये वास्तव्य करावे लागले होते. त्यात टिळक हरले व त्यांचे खूप नुकसान झाले, पण टिळकांविरूद्ध जाणाऱ्या त्या माणसाने स्वत:च्याच पुस्तकात टिळकांचा गौरवपूर्ण उल्लेख केलेला आहे.

प्रवास करताना गोडबोले सर विविध ठिकाणी हेतुपुरस्सर केलेल्या योजनांचे महत्व सांगत होते. उदा; पदपथवर मध्येच आढळणाऱ्या उंचवट्यांच्या टाईल्स. आंधळ्या व्यक्तींना रस्ता ओलांडण्या ठिकाणी आले हे कळावे, म्हणून ही योजना. रेल्वेस्टेशनवर कुठे आग लागली, तरी जवळचे बाहेर पडण्याचे दार कुठे आहे, आग विझवण्यासाठी साधनसामुग्री कुठे आहे. हे दाखवणाऱ्या पाट्या जागोजागी होत्या, त्याच्याशीच, संबंधित काम गोडबोले सरांनी लंडन मध्ये येऊन केले होते. व आता ते निवृत्त झाले होते.

दुपारच्या जेवणाच्या वेळी आम्ही इंडियन वाय.एम.सी.ए. मध्येच आलो होतो. संध्याकाळी ६.३० वाजता आम्ही तेथे परतलो. आज खूप महत्त्वाच्या गोष्टी पाहिल्याचे समाधान मिळाले. ज्यांच्यामुळे आज या सर्व गोष्टी पाहायला मिळाल्या होत्या, त्या स्मारकशीला भारतीय माणसांनी इंग्रज सरकारच्या पाठी लागून बसवून घेतल्या होत्या असे कळले.

१५-५-०६

आज काही नवीन ठिकाणे पाहण्यासाठी आम्हाला थेम्स (टेम्स) नदीच्या पलीकडे जायचे होते. त्यानिमित्ताने आम्हाला एक नवीन अनुभव घेता आला. ड्रायव्हरशिवाय चालणाऱ्या व नदीच्या खालून पलीकडे जाणाऱ्या ट्रेनमधून आम्ही पैलतीरी गेलो. अशा बिन चालकाच्या ट्रेनला DLR असे म्हणतात. DLR मधून प्रवास करून आल्यावर आम्ही नदीच्या किनाऱ्यावर कटि सार्क नावाची एक बोट पाहिली इंग्लंडला जर्मनी विरूद्धच्या नौकायुद्धात विजय मिळवून देणारी ही बोट तिच्या नावावरून त्या रेल्वेस्टेशलाही 'कटि सार्क' हे नाव दिले आहे. ती भव्य नौका पाहून झाल्यावर आम्ही ग्रीनव्हीच गावी निघाली 'ग्रिनीच' असा उच्चार करत असलेल्या या गावाचे नाव ग्रीनव्हीच आहे, हे मला तेव्हा कळले. आधी एका बागेतून चालत चालत व मग एक टेकडी चढून गेल्यावर आम्ही 0° रेखावृत्तापर्यंत पोचलो 0° रेखावृत्ताबद्दल जेव्हा शाळेत शिकले होते, तेव्हा या

जागेपर्यंत आपण कधी येऊ, असे स्वप्नात देखील वाटले नव्हते. त्या रेखावृत्ताच्या डावीकडे एक व उजवीकडे एक असे पाय ठेवून सगळ्यांनी फोटो काढले. रेखावृत्ताशेजारी ग्रीनव्हीच वेधशाळेची इमारत होती. आता तेथे वेधशाळा नसून एक नौकानयनाचे संग्रहालय होते. आपण समुद्रात दूरवर गेल्यावर चहुकडे पाणीच पाणी अशी स्थिती झाल्यावर आपण कुठल्या स्थानावर आहोत हे कसे ओळखायचे, म्हणजेच अक्षवृत्त व रेखावृत्तीय स्थान कसे ओळखायचे हे तेथे दोन-दोन मिनिटांच्या दोन माहितीपटामधून समजावून सांगितले जात होते. त्यासाठी लागणारी साधने खूप पूर्वीपासून अनेक शोध लावून विकसित केली गेली होती, त्यांचेही नमुने त्या संग्रहालयात होते. वेगवेगळ्या प्रकारच्या दुर्बिणी तेथे स्वतंत्र खोल्यांमध्ये लावून ठेवलेल्या होत्या.

दुपारी १२ वाजता आम्ही संग्रहालयामधून बाहेर आलो. संग्रहालयाच्या इमारतीच्या वर एक मोठा गोल एका स्तंभात बसवलेला होता. १२ वाजता तो गोल स्तंभाच्या टोकापर्यंत वर गेला. तेथील वेळ ही देशाच्या वेळेपेक्षा १ तासाने मागे होती. त्याचे कारण मात्र समजले नाही. संग्रहालयाच्या इमारतीत एक छोटे दुकानही होते, तेथे दुर्बिण, कॅलिडोस्कोप असे साहित्य मिळत होते. मी तेथून Raizor Piramid Scope हा प्रकार नवीन वाटला म्हणून आणला. मग एका भारतीय हॉटेलातच आम्ही दुपारचे जेवण करून घेतले.

आता आम्हाला पुन्हा नदीच्या पलीकडे जायचे होते. तेव्हा असे कळले की नदीच्या खालून एका बोगद्यातून चालतही पलीकडे जाता येते. परंतु जेवण झालेले असल्याने पुन्हा DLR नेच पलीकडे जायचे सर्वांनी पसंत केले, बिनचालकाच्या ट्रेनमधील प्रवास पुन्हा एकदा अनुभवून आम्ही बंकिंगहॅम पॅलेस पाहायला गेलो. येथे इंग्लंडची राणी अजूनही राहते. त्या भव्य महालाचे फोटो काढून झाल्यावर व तो राणीच्या वाट्याला कसा आला त्याची गोष्टी ऐकून झाल्यावर आम्ही पुढे निघालो. पॅलेसच्या समोरील शिल्पकलेत नटलेला मनोराही अतिशय सुंदर होता. त्याच्या समोर दुतर्फा फुलझाडांचे ताटवे होते. पुढे नॅशनल गॅलरीकडे जाता जाता आम्हाला लांबूनच 'लंडन आय' या प्रचंड जायंट व्हील चे दर्शन घडत होते. लांबूनही एवढ्या मोठ्या दिसणाऱ्या त्या चक्राला जवळून पाहायला आम्ही उत्सुक झालो.

अशाच विविध गोष्टी पाहत पाहत आम्ही नॅशनल गॅलरी जवळ येऊन पोहोचलो. एका मोठ्या कारंजाने व त्यात पोहणाऱ्या बदकांनी आमचे स्वागत केले. आतमध्ये खूप सुंदर सुंदर चित्रे होती. पण तेथे घालवण्यासाठी जास्त वेळ आमच्याकडे नव्हाता. शिवाय लंडन आय मध्ये बसायला देतील की काय, असेही वाटत होते. परत येताना आम्ही त्या जायंट व्हीलच्या अगदी जवळ गेलो, पण त्यात बसून बाहेर यायला बराच वेळ, म्हणजे तीन चार तास लागतात म्हणून त्यात बसू दिले नाही. खरं म्हणजे त्याचा आकार पाहूनच आमच्या डोळ्याचे पारणे फिटले होते. कॅमेऱ्यातून तर ते संपूर्ण पाहताच येत नव्हते. या चक्राच्या डब्यात बसून उंच-उंच गेलो, की संपूर्ण शहराचे दृश्य दिसते असे म्हणतात.

परत येत असताना फूटपाथजवळ असलेल्या वृक्षांच्या फुलांचे केस वाऱ्यावर उडून डोळ्यात वगैरे जात होते. त्यामुळे काही जणांना शिंका येत होत्या, तर काही जण डोळे चोळत होते. संध्याकाळी ७ वाजता डॉ. आंबेकर येणार असल्याने आम्ही घाईने वसतिगृहावर परतलो. येऊन बसलो. डॉ. आंबेकर व श्रीमती आंबेकर यांना यायला थोडासा उशीर झाला. त्या दोघांनी अतिशय मोकळेपणाने आमच्याशी गप्पा मारल्या, आमचे दहा दिवसांतील अनुभव विचारले, काय शिकता आले, ते विचारले, आपल्याला भारताला सर्वश्रेष्ठ बनवायचे असेल, तर आपल्या संस्कृतीचे जतन केले पाहिजे असे सांगितले. भारताच्या व तेथील शिक्षणपद्धतीतील फरक त्यातील फायदे कोणते, तोटे कोणते यावरही चर्चा झाली. आम्ही सर्वांना भविष्यासाठी

शुभेच्छा देऊन त्या दोघांनी आमचा आनंदाने निरोप घेतला.

१६-५-०६

आज आमच्या लंडनमधील वास्तव्याचा शेवटचा दिवस. आज इंडियन वाय.एम.सी.ए. मध्ये राहता येणार नसल्याने आम्हाला दुसऱ्या यूथ हॉस्टेलमध्ये जावे लागणार होते. बॅगा भरून व नाश्ता करून आम्ही हॉलमध्ये आलो. तेव्हा LECT संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती मिलर आल्या होत्या. त्यांनी आम्हाला प्रमाणपत्र व संस्थेचा अहवाल दिला.

आम्ही ब्रिटिश लायब्ररी बघायला गेलो तेथे एक छान प्रदर्शन होते. तेथे संगणकाच्या साहाय्याने टेबलाचेच पुस्तक केले होते. ते ऐकण्याची सोयही होती. शिवाय इतर पुस्तके, नकाशे हेही ठेवलेले होते. या शिवाय इतर पुस्तके, नकाशे हेही ठेवलेले होते. याच ब्रिटिश लायब्ररीचे डॉ. बेडेकर सदस्य आहेत असे कळले.

ब्रिटिश ग्रंथालय बघून झाल्यावर आम्ही ब्रिटिश संग्रहालय बघायला गेलो. एवढा मोठा संग्रहालय आम्ही आतापर्यंत कुठेच बघितला नव्हता. हे संग्रहालय बघण्यासाठी आठ दिवसही पुरे पडणार नाहीत, हे आगरकर सरांनी आम्हाला आधीच सांगितले होते. भारतीय, चिनी, जपान, ग्रीक, इजिप्शिअन अशा वेगवेगळ्या संस्कृतींसाठी वेगवेगळ्या संस्कृतींसाठी वेगवेगळी दालने होती. सर्व दालनांमध्ये एकदा फेरफटका मारून मग आम्ही भारतीय संस्कृतीचे दालन बारकाईने पाहू लागलो. प्राचीन भारतीय शिल्पे, रत्नजडित भांडी इ. वस्तू तेथे जपून ठेवलेल्या होत्या, तसेच प्रत्येकीचे वर्णन करून त्यात सर्व बारकाव्यांचा उल्लेख केलेला होता. आपण तरी आपल्या संस्कृतीचे, ऐतिहासिक वस्तू व वास्तूंचे जतन करून ठेवतो का, असा प्रश्न मला पडला. दुसऱ्या देशातील लोकांना याचे महत्त्व पटून ते कृती करतात, तर आपण आपल्याबाबत ते करायलाच पाहिजे असे मला वाटू लागले. खरेच, देवदेवतांच्या मूर्तींनी ते भारतीय दालन खचाखच भरले होते व त्या संग्रहालयाची शान बनले होते.

या सर्व गोष्टी पाहून झाल्यावर आम्हाला ऑक्सफर्ड स्ट्रीट वर खरेदीसाठी सोडले होते. दुकानांमध्ये गेलो, तेव्हा आपल्या देशात वस्तू किती स्वस्त मिळतात ते कळले. तेथे सारेच महाग असल्याने काय घ्यावे हे सुरुवातीला कळले नाही. मग जमेल तशी खरेदी करून झाल्यावर सर्वजण भुयारी रेल्वेने वसतिगृहामध्ये आलो दुसऱ्या दिवशी सकाळीच निघायचे असल्याने रात्रीच बॅगा भरून ठेवल्या.

१७-५-०६

आज सकाळी ७ ला निघून मेट्रो ने विमान तळावर पोहोचलो. नाश्त्याचे पॅकेज होस्टेलमध्येच घेऊन ठेवले होते. ११ वाजता लंडनहून कुवेतला येणारे विमान सुटले. कुवेतच्या विमानतळावर मिळालेल्या दोन तासांत त्या विमानतळावरील दुकानांतही हिंडलो. त्यानंतर कुवेत ते मुंबई हा रात्रीचा विमानातील प्रवास झाला विमान मुंबईत सहार विमानतळावर उतरत होते, तेव्हा विमानातून खाली दिव्यांनी चमकणारी मुंबई बघताना मजा आली.

शिवाय आपण आपल्या मायदेशी परततोय याची जाणीव होऊन आनंदही झाला. अखेरीस विमान मुंबईत उतरले व घरच्यांना भेटण्याची सर्वांना ओढ लागली होती. आपापले सामान ताब्यात यायला थोडा वेळ लागल्याने बाहेर पडायला जरा उशीर झाला. बाहेर आलो तेव्हा १८ तारखेची सकाळ झालेली होती. आम्हे कुटुंबियांकडून व सर्वांच्याच आई-वडिलांकडून आमचे जोरदार स्वागत झाले. थंड हवेच्या देशातून आल्यामुळे उन्हाळा व चिकचिकाट चांगलाच जाणवत होता. पण या सगळ्यापेक्षा भारतात परत आल्याचा आनंद सर्वांत जास्त होता

मधुरा केतकर

# परिसर वार्ता

## डॉ. बेडेकर विद्यामंदिर माध्यमिक विभाग

१ व २ जून ०६ रोजी झालेल्या 'ॲथलेटिक्स् फेडरेशन ऑफ इंडिया', नवी दिल्ली येथे झालेल्या राष्ट्रीय स्तरावर इ. ८ वी क मधील कु. आदित्य इंदुलकर (१४ वर्षा खालील वयोगटात) याने महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले त्याने-

| | |
|---|---|
| ८०० मीटर धावणे | ३ रा क्रमांक |
| उंच उडी | २ रा क्रमांक |
| लांब उडी | २ रा क्रमांक |
| १०० मीटर उडी | २ रा क्रमांक |
| गोळा फेक | ३ रा क्रमांक |

व पॅंटाथलॉन मध्ये २ रे स्थान पटकावले.

**३ जुलै ०६ -**

ठाणे स्काऊट-गाईड व सामाजिक वनीकरण यांच्या संयुक्त विद्यमाने 'वृक्षदिंडी' आयोजित केली होती. वृक्षदिंडीत इ. ७ वी क चे स्काऊटस् व गाईडस् तसेच स्काऊटमास्तर श्री. पांचाळ व गाईड कॅप्टन कु. आशालता लोखंडे उपस्थित होत्या.

**११ जुलै ०६**

'गुरूपौर्णिमा' कार्यक्रम प्रत्येक वर्गात सादर करण्यात आला.

५ वी व ९ वी च्या विद्यार्थ्यांनी आपापल्या वर्गात गोष्टी सांगून कार्यक्रम सादर केला तर ६वी च्या विद्यार्थ्यांना प्रमुख पाहूण्या मा. मुख्याध्यापिका सौ. केळकरबाई उपस्थित होत्या.

७ वी साठी प्रमुख पाहूण्या माजी उपमुख्याध्यापिका सौ. चौबळबाई उपस्थित होत्या.

इ. ८वी साठी श्री. वामन देशपांडे तर इ. १०वी साठी शालांत परीक्षेत मुंबई बोर्डात सर्वप्रथम आलेली कु. जुईली जोशी ही प्रमुख पाहूणी होती.

**३० जुलै ०६-**

टिळक पुण्यतिथीनिमित्त ब्राह्मण सभा, ठाणे तर्फे वक्तृत्व स्पर्धा आयोजित केली होती. या वक्तृत्व स्पर्धेचा विषय होती ''शालेय शिक्षणात गणिताचे स्थान आपल्या शाळेतील कौस्तुभ बांबरकर हा प्रथम आला यात ४० विद्यार्थ्यांचा सहभाग होता. गणित अध्यापक मंडळातर्फे इ. ५वी व ८ वी साठी गणित संबोध परीक्षा घेण्यात आली यात इ. ५ वी च्या ४४ व इ. ८ वी च्या ७७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

दिशा
नियमित
वाचा.

आपली
मते
जाणून
घेण्यास
आम्ही
उत्सुक
आहोत.